# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२१

---

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**अंबड व सातपूर (जि.नाशिक) येथील औद्यागिक वसाहतीकडून करण्यात आलेला मल:निस्सारण कर परत करण्याबाबत**

**(१) ३७ (०५-०४-२०२०). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील अंबड व सातपूर औद्योगिक वसाहतीत वसूल करण्यात आलेला मलनि:स्सारण कर औद्योगिक महामंडळाला परत करण्याचा आदेश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक ५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास नाशिक महानगरपालिकेला दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदरची मागणी कोणत्या कारणासाठी व शासनाच्या कोणत्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने केलेली आहे,

(३) असल्यास, शासनाच्या नियमांचे व आदेशाचे उल्लंघन करून बेकायदेशीररित्या नाशिक महानगरपालिकेकडे मलनि:स्सारण कराची मागणी करणाऱ्या प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (०३-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) मा. राष्ट्रीय हरित लवादाने मूळ अर्ज क्र. १०३८/२०१९ या प्रकरणी दिलेल्या आदेशाच्या पूर्ततेच्या अनुषंगाने सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १०/१२/२०१९ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये नाशिक महानगरपालिका, सातपूर व अंबड औद्योगिक वसाहतीतील घरगुती सांडपाणी विनाप्रक्रिया नाल्याद्वारे गोदावरी नदीत मिसळत असल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे सदर बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानूसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक १३/१२/२०१९ रोजी नाशिक महानगरपालिकेला मल:निस्सारण कर महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाकडे हस्तांतरीत करण्याकरिता व त्याचा उपयोग मल:निस्सारण संयंत्रणा उभारण्याकरिता करण्यासाठी निर्देश दिले होते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दवाढीचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(२) १०५४ (२०-०३-२०२०). ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)नाशिक शहरालगतची काही गावे शहरात समाविष्ट झाली असल्याने वाढत्या शहरीकरणामुळे शहर पोलीस आयुक्तालय, नाशिक यांनी हद्दवाढीचा प्रस्ताव शासनास सादर केला असून सदर प्रस्ताव गृह विभागाकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,गत काही वर्षात नाशिक शहरालगतच्या ओझर, निफाड, इगतपुरी व त्र्यंबकेश्वर तालुक्याच्या सीमारेषा वाढत्या शहरीकरणामुळे एक झाल्याने तसेच व्यावसायिक व रोजगारामुळे या तालुक्यांचा अतिरिक्त भार नाशिक शहरावर पडत असून शहरात अवैध तसेच धंदे, खून, दरोडे, खंडणी, टोळी युध्द व अपहरण इत्यादीमध्ये वाढ होऊन कायदा सुव्यवस्थेला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, याबाबत चौकशी करून उक्त प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१५-०९-२०२१) :** (१),(२) व (३) पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांच्या आस्थापनेवरील नाशिक तालुका पोलीस ठाणे हे पोलीस आयुक्त,नाशिक शहर यांच्या कार्यक्षेत्रामध्ये वर्ग करणे. तसेच नाशिक तालुका पोलीस ठाणे हद्दीतील पिंप्री सय्यद व विल्होळी ही गावे पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांच्या आस्थापनेवरील अनुक्रमे आडगांव व इंदिरानगर पोलीस ठाणे हद्दीमध्ये समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाने शासनास सादर केला. तथापि, तदनंतर पोलीस अधीक्षक,नाशिक ग्रामीण यांचे आस्थापनेवरील ओझर पोलीस ठाणे, पोलीस आयुक्त,नाशिक शहर यांच्या आस्थापनेवर वर्ग करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस आयुक्त,नाशिक शहर यांनी दि.१२.११.२०१९ रोजीच्या पत्रान्वये पोलीस महासंचालक कार्यालयास सादर केला होता. पोलीस आयुक्त,नाशिक शहर व पोलीस अधीक्षक,नाशिक ग्रामीण हद्दीमध्ये बदल करून कार्यक्षेत्राची पुनर्रचना करण्यासंदर्भात पोलीस अधीक्षक,नाशिक ग्रामीण, पोलीस आयुक्त,नाशिक शहर व विशेष पोलीस महानिरीक्षक,नाशिक परिक्षेत्र या तिन्ही घटक प्रमुखाच्या एकत्रित शिफारशीसह अहवाल पाठविण्याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाने संबधिताना कळविले आहे. पोलीस आयुक्त,नाशिक शहर व पोलीस अधीक्षक,नाशिक ग्रामीण हद्दीमध्ये बदल करून कार्यक्षेत्राची हद्दनिश्चिती करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडून संमतीपत्र मिळवण्याबाबतची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे. सदरचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल.

नाशिक शहरालगतच्या ओझर, निफाड, इगतपुरी व त्र्यंबकेश्वर तालुक्याच्या सीमारेषा वाढत्या शहरीकरणामुळे एक झाल्यामुळे गत पाचवर्षातील गुन्हयांच्या आकडेवारीची तुलना केली असता गुन्हयांच्या संख्येत थोडया प्रमाणात वाढ झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यातील रस्त्यांची कामे न करताच देयके दिल्याबाबत**

**(३) ५३५५ (२१-०३-२०२०). (१) : श्री नारायण कुचे (बदलापूर)** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यातील फुलंब्री-तळेगाव-राजूर ते रामा-२१६ व लाडसावंगी-भाकरवाडी-कोलतेटाकळी ते रामा-२१५ रस्त्याचे काम न करता देयके देण्यात आल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी चौकशी करून कारवाईची मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत कामात डांबराचा गेटपास दुस-या कामावर वापरण्यात आला होता तसेच हे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास मुख्य अभियंता, सा.बां.परिमंडळ, औरंगाबाद तसेच दिनांक १ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास सचिव, रस्ते यांनाही निवेदन देऊन चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी असणा-यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१२-०८-२०२१) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) (४) व (५) प्रश्नाकिंत कामांमधील, रामा-२१६ या रस्त्यावर एक काम मंजुर होते ते काम पुर्ण झाले असून सदर रस्ता राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. तसेच रामा-२१५ या रस्त्यावर ३ कामे मंजुर होती, त्यापैकी १ काम पुर्ण असून उर्वरीत २ कामे प्रगतीत आहेत.

सदर कामांपैकी औरंगाबाद जिल्हा, फुलंब्री तालुक्यातील रामा-५० पासून मडेवडगाव खानापुर नागमठाण-काटेपिंपळगाव-शंकरपुर लासुर स्टेशन डोणगाव रामा-२६ कसाबखेडा वेरुळ खुलताबाद फुलंब्री-तळेगाव राजुर अकोला किमी ९२/०० ते ११२/०० मधील रस्त्याची सुधारणा व दोन वर्षासाठी देखभाल दुरुस्ती करणे (रामा-२१६) या कामाची चौकशी अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नागपूर यांचे मार्फत केली असून चौकशी अहवालातील तथ्यांशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**अमरावती येथील शिक्षणाधिकारी यांनी केलेली अनियमितता**

**(४) ११८१० (१३-०९-२०२०). श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.राजेश पाडवी (शहादा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील शिक्षणाधिकारी (माध्य) श्रीमती निलिमा टाके यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई तसेच बदलीची शिफारस करण्याचा प्रस्ताव तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मनीषा खत्री यांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे अपर सचिव शिक्षण आयुक्त (पूणे) यांच्याकडे दिनांक ९ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास सादर केला असूनही श्रीमती निलिमा टाके यांच्यावर कोणतीही कारवाई झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळांसाठी डिजिटल डिस्प्ले इन लर्निंग आणि संगणक साहित्य खरेदी करताना इ - निविदा प्रक्रिया न राबविता अनियमितता केल्याचे स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राप्त झालेला निधीचा विशिष्ट पूरवठादारांना फायदा होईल या हेतूने श्रीमती टाके यांनी कार्यवाही केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनास जिल्हा परिषद सी.इ.ओ मार्फत श्रीमती टाके यांच्या निलंबनाचा प्रस्ताव पाठवुन ६ महिने होऊनही वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून विलंब होत असल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (१२-०८-२०२१) :** (१), (२), (३) व (४) याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प., अमरावती यांच्याकडून प्राप्त प्राथमिक चौकशी अहवालाच्या अनुषंगाने आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनास सादर केलेल्या प्रस्तावात उपस्थित केलेल्या ३ मुद्दां पैकी मुद्या क्र. ३ च्या अनुषंगाने श्रीमती टाके यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याकरिता आयुक्त (शिक्षण), पुणे यांना दि. ०६.०६.२०२१ च्या पत्रान्वये सूचीत करण्यात आलेले आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धारावी (मुंबई) येथे कार्यरत असलेल्या बेस्ट च्या अधिकाऱ्याला मृत देह नेण्यास शववाहिनी उपलब्ध झाली नसल्याबाबत**

**(५) १२०५१ (१७-०९-२०२०). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील धारावीत कार्यरत असलेल्या बृहन्मुंबई विदयुत पुरवठा आणि परिवहन (बेस्ट) च्या वरिष्ठ अधिका-यांचा कोरोनामुळे दिनांक १९/५/२०२० रोजी वा त्यासुमारास त्यांच्या राहत्या घरीच मृत्यु झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांच्या कुटुंबियांनी अंत्यविधीसाठी महानगरपालिकेच्या हेल्पक्रमांक १९१६ वर कळवूनही शववाहीनी उपलब्ध न झाल्यामुळे मृतदेह जवळपास दहा तास घरातच होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या हेल्पलाईनवरुन रुग्णवाहिका वेळेत न येण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत. तसेच या प्रकरणात दोषी असलेल्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०८-२०२१) :** (१) बेस्ट उपक्रमाच्या धारावी सेलमधे कार्यरत श्री. विनायक कारंडे यांचा दिनांक १९.०५.२०२० रोजी संध्याकाळी सुमारे १७.३० वाजता त्यांच्या दहिसर येथील राहत्या घरी मृत्यू झाल्याची घटना घडली असल्याचे बेस्ट उपक्रमामार्फत कळविण्यात आले आहे.
(२) श्री. कारंडे यांचा दिनांक १९.०५.२०२० रोजी कोरोनामुळे मृत्यू झाल्यानंतर त्यांचे शव स्मशानभूमीत नेण्याकरिता शववाहिनी आवश्यक असल्याबाबत त्यांचे शेजारी श्री. नितीन सावंत यांचा महानगरपालिकेच्या १९१६ या हेल्पलाईन क्रमांकावर दिनांक २०.०५.२०२० रोजी मध्यरात्री ०१.०३२ वाजता दूरध्वनी आला होता.

सदर दूरध्वनी प्राप्त होताच बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत शववाहिनीची व्यवस्था करण्यात येत असतांनाच मध्यरात्री ०२.३० ते ३.०० च्या दरम्यान सदर मृतदेह संबंधितांनी खाजगी वाहनातून स्मशानभूमीत नेल्याचे निदर्शनास आले असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) सदर प्रकरणी कोणतीही तक्रार प्राप्त न झाल्यामुळे चौकशी करण्यात आली नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दसरखेड (ता.मलकापूर जि बुलढाणा) येथील बॅन्जो केमिकल कंपनी रसायनयुक्त पाणी शेतात व तलावात सोडत असल्याबाबत**

**(६) १२२७८ (११-०७-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दसरखेड (ता.मलकापूर, जि बुलढाणा) परिसरातील औद्योगिक विकास महामंडळातील बॅन्जो केमिकल कंपनीने रसायनयुक्त पाणी टँकरद्वारे शेत जमीन व परिसरातील तलावात सोडल्याने चिखली-राणथंम येथील अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी नापिक झाल्याचे माहे नोव्हेंबर- डिसेंबर २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी उपविभागीय महसूल अधिकारी, मलकापूर यांच्याकडे तक्रार केली असून हरसोडा व विवरा (ता.मलकापूर) येथील शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने झालेल्या चौकशीमध्ये सदर शेतजमिनीचा माती परिक्षण अहवालात शेती योग्य नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच शेतकऱ्यांच्या जमिनीमध्ये क्षार व केमिकलयुक्त पाणी सोडून शेतजमिन नापिक करणाऱ्या संबंधित कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (१७-०८-२०२१) :** (१) व (२) • दिनांक १७/१०/२०१९ रोजी प्रश्नाधीन विषयाबाबतची तक्रार उपविभागीय दंडाधिकारी, मलकापूर यांच्या कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान सदर उदयोगांमधून औद्योगिक सांडपाणी नैसर्गीक नाल्यामध्ये अथवा एमआयडीसी च्या रस्त्याशेजारील नाल्यामध्ये सोडल्याचे आढळून आले नाही.

• तसेच, जिल्हा अधिकारी कृषी अधिकारी, बुलढाणा यांच्याकडून प्राप्त अहवालानूसार चिखली रणथंब येथील शेतकऱ्यांच्या शेतजमीनी नापिक झाल्याचे आढळून आलेले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील विलेपार्ले पश्चिम येथे अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करणेबाबत**

**(७) १२४३४ (१३-०९-२०२०). कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विलेपार्ले पश्चिम येथे वारंवार कारवाई करूनही रेल्वे स्थानकासमोर भररस्त्यावर अंमली पदार्थ विकले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंमली पदार्थ सेवन तसेच विक्री करणाऱ्या व्यक्तींमुळे सदर परिसरात राहणाऱ्या नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून परिसरात वारंवार मारामारीच्या घटनाही घडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक नागरीक व लोकप्रतिनिधींनी तक्रारी केल्या असतानाही प्रशासनाकडून कोणतीही कारवाई झाली नाही , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विलेपार्ले येथे अंमली पदार्थ विकणाऱ्यांवर कारवाई करून अंमली पदार्थ विक्रीवर अंकुश ठेवण्यासाठी कायदा अधिकाधिक व्यापाक व कठोर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करत आहे,

(५) नसल्यास ,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१९-०७-२०२१) :** (१) हे खरे आहे. अंमली पदार्थ विरोधी कक्ष मुंबईकडुन सन २०१९ मध्ये मुंबईतील विलेपार्ले परिसरात अंमली पदार्थ विक्री करणा-या विरुद्ध ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. नमुद ०२ गुन्ह्यांमध्ये ३ आरोपीतांना अटक करण्यात आली असुन ०९ किलो ६५० ग्रॅम गांजा (अंदाजे किंमत १,९३,०००/- रुपये) अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेला आहे.

सन २०२० मध्ये मुंबईतील विलेपार्ले परिसरात अंमली पदार्थ विक्री करणा-या विरुद्ध १ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद १ गुन्ह्यामध्ये १ आरोपीस अटक करण्यात आली असुन २५० ग्रॅम एम.डी. (अंदाजे किंमत १०,००,०००/- रुपये) हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) विलेपार्ले पश्चिम येथील स्थानिक नागरीक व लोकप्रतिनिधींच्या तक्रारी आढळून आल्या नाहीत.

(४) विलेपार्ले परिसरात अंमली पदार्थ विरोधी कक्षातील साध्या वेषातील अधिकारी/ अंमलदारांकडून, अंमली पदार्थ विक्री करणा-या इसमांवर पाळत ठेवून गुप्त बातमीदारांमार्फत माहिती प्राप्त करुन कारवाई करण्यात येत आहे. तसेच अंमली पदार्थाच्या सेवनामुळे होणा-या दुष्परिणामांबाबत वेळेवेळी शाळा, महाविद्यालय येथे जनजागृती अभियान कार्यक्रम राबविण्यात आलेले आहेत.

(५) विलंब झालेला नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(८) १२४५६ (१९-०९-२०२०). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ चे कलम २ (२) अंतर्गत झालेल्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याचे सन २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आले, तद्नुसार प्रकरण ५ चे कलम २(२) अंतर्गत ठराविक कंपन्यांनाच कामे देवून गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित ठेकेदार व महानगरपालिका प्रशासनातील अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) व ३) उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभाग व पाणी पुरवठा विभागातील महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड मधील प्रकरण क्रमांक ५ नियम २ (२) नुसार मंजूर झालेल्या कामांमधील अनियमिततेच्या अनुषंगाने चौकशी करणेकरिता उल्हासनगर महानगरपालिकेच्या दिनांक ५ ऑक्टोबर, २०१९ रोजीच्या आदेशान्वये समिती स्थापन करण्यात आली असून, चौकशी समितीचा अहवाल अद्यापि अप्राप्त असल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**चांदोली अभयारण्यातील (जि.सांगली) वन्य प्राणी शिराळा व वाळवा परिसरातील नागरिकांवर व पाळीव प्राण्यावर हल्ले करित असल्याबाबत**

**(९) १२४९९ (१८-०८-२०२०). श्री.मानसिंग नाईक (शिराळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदोली अभयारण्यातील (जि.सांगली) वन्य प्राणी जंगलाबाहेर पडून शिराळा व वाळवा परिसरातील नागरिकांवर व पाळीव प्राण्यांवर मोठया प्रमाणात हल्ले केल्याच्या घटना माहे एप्रिल व मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उक्त हल्ल्यामूळे मोठया प्रमाणात जिवितहानी होउन शेतपिकांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वन्य प्राणी अभयारण्यातुन बाहेर पडू नयेत याकरिता शासनाने कोणत्या प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) असल्यास, वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामध्ये होणारी जिवीतहानी व पीक नुकसानीबाबत शासनाकडून दिला जाणारा मोबदला अत्यल्प असून यामध्ये वाढ करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (१४-०९-२०२१) :** (१) व (२) चांदोली अभयारण्यातील शिराळा व वाळवा परिसरात माहे एप्रिल, २०२० ते मे, २०२० या कालावधीत वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात २ व्यक्ती किरकोळ जखमी झाले आहेत तर पाळीव प्राण्यावर हल्ला झाल्याच्या १० घटना निदर्शनास आल्या आहेत.

प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित नुकसानग्रस्तास अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.
(३) वन्यप्राणी अभयारण्य क्षेत्रातुन बाहेर पडून मानव-वन्यप्राणी संघर्ष रोखण्याच्या दृष्टीने क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी रात्र-दिवस अभयारण्य परिसरात गस्त करुन वन्यप्राण्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवतात.
- वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीपोटी संबंधित नुकसानग्रस्त व्यक्तीस अथवा त्याचे कायदेशीर वारसास प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार अर्थसहाय्य अदा करण्यात येते.
- अभयारण्य लगतच्या गावात रानगव्याचा / हत्तीचा वावर असलेल्या क्षेत्रात मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने घ्यावयाच्या दक्षतेबाबत ग्रामस्थामध्ये जन-जागृती करण्यात येते.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पुरेसा चारा उपलब्ध होण्यासाठी आवश्यक ठिकाणी कुरण विकासाची कामे करण्यात येतात.
- उन्हाळ्यात वन्यप्राण्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता आवश्यक ठिकाणी पाणवठे तयार करण्यात येतात.

(४) प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मनुष्य मृत / अपंग / गंभीर जखमी / किरकोळ जखमी झाल्यास संबंधितास किंवा त्याचे कायदेशीर वारसास अदा करण्यात येणारे अर्थसहाय्य हे देशातील इतर राज्याच्या तुलनेत सर्वात जास्त आहे.

वन्यप्राण्यांमुळे शेपिकाचे होणाऱ्या नुकसानी पोठी प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील मानखुर्द शिवाजीनगर येथे एस. एम. एस. एक्सक्लुजीव्ह नामक रासायनिक कंपनीमुळे प्रदूषणात वाढ होत असल्याबाबत**

**(१०) १३३४४ (१७-०९-२०२०). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील एम-पूर्व विभागात एस. एम. एस. एक्सक्लुजीव्ह नामक रासायनिक कंपनीमुळे मानखुर्द - शिवाजीनगर विभागात प्रदूषणात वाढ होत असल्याची बाब दिनांक माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनी लवकरात लवकर स्थलांतरित करण्यात येणार असल्याचे मा. पर्यावरण मंत्री यांनी आश्वासित करूनही अद्यापपर्यंत कंपनी बंद करण्यात आली नाही तसेच कंपनीचे स्थलांतरण करण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिक, सेवाभावी संस्था, लोक प्रतिनिधी यांच्यामार्फत वेळोवेळी धरणे आंदोलने करुन संबंधित विभागांना कंपनी बंद करण्याबाबत निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विभागात वाढत असलेल्या प्रदूषणामुळे लोकांच्या आरोग्याला धोका झाला निर्माण असून सदर विभागातील सामान्य नागरिकांचे आयुष्यमान हे ३९ वर्ष असल्याचे एका अहवालातून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. आदित्य ठाकरे (०६-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४), (५) व (६). प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली, मिरज व कुपवाड (जि.सांगली) शहर महानगरपालिकेचे सन १९९८ ते २०१५ या कालावधीचे विशेष लेखा परिक्षण करण्याबाबत**

**(११) १३४७३ (२०-०९-२०२०). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली, मिरज व कुपवाड (जि.सांगली) शहर महानगरपालिकेचे सन १९९८ ते २०१५ या कालावधीचे विशेष लेखा परिक्षण करण्याबाबत शासनाने निर्देशित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विशेष लेखा परिक्षणाचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, या अहवालाचे अनुपालन करुन यातील आक्षेपावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, शासनाकडून या अहवालातील आक्षेपावर तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात येणार आहेत काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची वस्तुस्थिती काय आहे?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०९-२०२१) :** (१) सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेचे त्या-त्या वेळी सन १९९८-२०००, सन २०००-२००६ व सन २००६-२०१० या कालावधीचे विशेष लेखापरिक्षण करण्याचे निर्देश दिले होते.

(२), (३) व (४) सन १९९८-२००० व सन २०००-२००६ या विशेष लेखापरिक्षणाचा अहवाल प्राप्त झाला असून सन १९९८-२००० च्या विशेष लेखापरिक्षणातील आक्षेपांवर महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात आलेली आहे.

- सन २०००-२००६ या कालावधीतील झालेल्या विशेष लेखापरिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने नियमोचित कार्यवाही प्रस्तावाधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पोलिसांविरोधातील तक्रारीचा निपटारा करणाऱ्या पोलीस तक्रार प्राधिकरणावरील नियुक्तीबाबत**

**(१२) १४६४६ (१३-०९-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलिसांविरोधातील तक्रारीचा निपटारा करणाऱ्या व सत्र न्यायालयाप्रमाणे अधिकार प्राप्त असलेल्या पोलीस तक्रार प्राधिकरणाच्या सदस्यपदी (नागरी समाजातील मान्यवर व्यक्ती) नियुक्ती करण्यासाठी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये गृह विभाग आणि वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करून इच्छुकांना दिनांक ३ ते ९ डिसेंबर, २०१९ या कालावधीत नरिमन पॉइंट येथील प्राधिकरणाच्या कार्यालयात अर्ज करण्यास सांगण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जाहिरातीनुसार इच्छुक उमेदवारांना आवश्यक तपशिलासोबत फौजदारी गुन्हा दाखल नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहिती अधिकारातून मिळालेल्या माहितनुसार या पदासाठी तेरा इच्छुकांनी विश्हित मुदतीत व विलंबाने श्री. राजकुमार ढाकणे यांचा एक मिळून १४ अर्ज निवड प्रक्रियेसाठी प्राधिकरणाने गृहविभागाकडे सुपूर्द केल्यावर गृह विभागाचे प्रधान सचिव (विशेष) श्री.अमिताभ गुप्ता यांनी राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाच्या सदस्यपदी श्री.राजकुमार ढाकणे यांची दिनांक १४ जुलै, २०२० रोजी नियुक्ती करण्याबाबतची अधिसूचना निर्गमित केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, श्री.राजकुमार ढाकणे यांच्या विरोधात सन २०१४-१५ मध्ये पुण्यातील कोरेगाव पार्क आणि विमानतळ पोलिस ठाण्यात दोन गुन्हे नोंद असून यापैकी कोरेगाव पार्क पोलिस ठाण्यात हत्येचा प्रयत्न केल्याचा तसेच पोलिसांच्या तावडीतून पसार झाल्याचा आरोपही त्यांच्यावर असल्याने कोठडीतील चौकशी आवश्यक आहे असे निरीक्षण नोंदवत सत्र न्यायालयाने त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला व या खटल्याची सुनावणी अद्याप सुरू आहे , हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळलेल्या व पोलिसांच्या तावडीतून पसार झाल्याचा आरोप असलेल्या श्री.राजकुमार ढाकणे यांची उक्त पदी नेमणूक करण्याची कारणे काय आहे,
(६) तसेच या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०७-०९-२०२१) :** (१),(२),(३),(४),(५) व (६) राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणावर “सदस्य-नागरी समाजातील मान्यवर व्यक्ती” या वर्गात नियुक्ती करीता जाहिरात देण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. यानुषंगाने प्राधिकरणास व शासनास अर्ज प्राप्त झालेले होते. यास अनुसरुन श्री.राजकुमार ढाकणे यांची नियुक्ती सदर पदावर करण्यात आली होती. तथापि, त्यांच्याविरुध्द दाखल असलेल्या गुन्ह्यांबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस महासंचालक यांनी शासनास सादर केलेला अहवाल विचारात घेऊन श्री.राजकुमार ढाकणे यांना उक्त प्राधिकरणाच्या सदस्य पदावरुन शासन अधिसूचना दि.५.७.२०२१ अन्वये काढून टाकण्यात आले आहे.

---

## प्रक्रिया न करता सांडपाणी समुद्रात सोडत असल्याबाबत केंद्रीय हरित लवादाने मुंबई महानगरपालिकेला केलेला दंड

**(१३) २००३२ (२४-११-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातून समुद्रात सांडपाणी सोडल्या जाणाऱ्या ८५ ठिकाणी योग्य ती प्रक्रिया करूनच ते समुद्रात सोडण्याबाबत राष्ट्रीय हरित लवादाने मुंबई महानगरपालिकेला आदेश दिले असून ही प्रक्रिया पूर्ण होत नाही तोपर्यंत दर महिन्याला ४.२५ कोटी रुपयांचा दंड तसेच आत्तापर्यंत झालेल्या हानीबद्दल २९.७५ कोटी रुपयांचा दंड केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे भरण्याबाबत आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांडपाण्यावर प्रक्रिया न होण्याच्या मुद्दयाबरोबरच अविघटनशील कचरा मल:निस्सारण वाहिन्यांमध्ये मिसळू नये यासाठी हे पाणी समुद्रात सोडण्याच्या ठिकाणी जाळ्या बसविण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रदूषित पाण्यामुळे कांदळवनाला हानी पोहोचू नये यासाठी आयआयटी, मुंबई यांनी सुचवलेल्या तंत्राचा वापर करण्याचे लवादाने आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास चौकशीत काय आढळून आले व उपरोक्त लवादाच्या आदेशानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (०६-०९-२०२१) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) मा. हरित लवादाच्या आदेशान्वये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मडळाने मुंबई महानगरपलिका यांना दिनांक ०९/१२/२०२० रोजी निर्देश दिले असून आदेशातील अटीं व शर्तींची पुर्तता करण्याविषयी निर्देशित केलेले आहे. या विषयासंबंधी मुंबई महानगरपालिकेडून सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल केल्याचे कळविले आहे.
मुंबई महानगरपालिकेने याबाबत अहवाल सादर केलेला असुन प्रदुषण रोखण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला असुन त्याची अमलबजावणी सुरु असल्याचे कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) शहरातील कापड उद्योगांना कागदपत्रे सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत**

**(१४) २०२९८ (१७-१२-२०२०). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी शहरातील कापड उद्योगांना महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सूचनेप्रमाणे सर्व कागदपत्रे सादर करण्यास दोन महिन्यांची मुदतवाढ देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४/०६/२०२० रोजी शासनास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोठ्या प्रमाणावर कचरा तसेच प्लास्टिक असे पर्यावरणास घातक घटक निर्माण होत असलेल्या उद्योगांवर कारवाई न करता विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या संगनमताने त्यांना संरक्षण व सूट देण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माहे मार्च, २०२० मध्ये कारवाईची नोटीस पाठविण्यात आलेले कापड उद्योग प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठरवून दिलेल्या कायद्यांचे व सूचनांचे पालन करीत नसल्याने सदर उद्योगांना वीज पुरवठा करणाऱ्या टोरेंट पॉवर या कंपनीकडून वीज पुरवठा खंडित करण्याची नोटीस देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली तसेच भिवंडी शहरातील कापड उद्योगांना महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सूचनेप्रमाणे सर्व कागदपत्रे सादर करण्यास दोन महिन्यांची मुदतवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (०६-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) मा. विधानसभा सदस्य भिवंडी (पुर्व) यांचे निवेदनानुसार मा. मंत्री, पर्यावरण यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २८/०२/२०२० रोजी बैठक पार पडली. सदर बैठकीतील निर्णयाप्रमाणे भिवंडी शहरातील प्रदूषणकारी उद्योगांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यानुसार शहरातील एकूण ६६ उद्योगांची सर्वेक्षण मार्च-२०२० महिन्यातील पूर्ण करण्यात आले. सदर सर्वेक्षणादरम्यान आढळून आलेल्या त्रुटींनुसार एकूण ३३ उद्योगांना उत्पादन बंदीचे आदेश पारित करण्यात आले होते. त्यानंतर उद्योगाकडुन बंदच्या आदेशाच्या अटी व शर्तीच्या अनुषंगाने अनुपालन, सुधारणा व संमतीपत्राच्या अटी व शर्तीचे पुर्तता करण्याच्या आश्वासनाच्या आधारे एकूण २८ उद्योगाना उद्योग पुन:श्च चालु करण्यासाठी आदेश पारित करण्यात आले.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर (जि.पालघर) कृषी संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञांची रिक्त पदे भरणे व कृषी महाविद्यालय स्थापन करण्याबाबत

**(१५) २०३२६ (२१-१२-२०२०). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर (जि.पालघर) कृषी संशोधन केंद्रामध्ये मागील सहा वर्षापासून भात पैदासकार, वनस्पती रोग शास्त्रज्ञ, चारसूत्री पीक शास्त्रज्ञ इत्यादी महत्त्वाच्या शास्त्रज्ञांची पदे भरली नसल्यामुळे जिल्हयातील मुख्य पीक असलेल्या भातावरील संशोधन संपूर्णतः बंद झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्हयात भात, चिकू, नारळ व भाजीपाल्यांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जात असल्यामुळे कृषी महाविद्यालय स्थापन करण्याबाबतची मागणी स्थानिकांनी अनेक वर्षापासून शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकरी कर्ज घेऊन विविध कंपन्यांकडून बियाणे खरेदी करुन बियाणे शेतात लावल्यानंतर भेसळ, निकृष्ट उगवन, कीड व रोगाचा प्रादुर्भाव होऊन पिकांचे नुकसान होते, त्यावेळी शेतकरी कृषी विभागाकडे तक्रार करतात पण या रोगांवर संशोधन करण्यासाठी शास्त्रज्ञ उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या तक्रारीचे योग्य निवारण होत नसुन शेतकऱ्यांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन पालघर कृषी संशोधन केंद्रामधील शास्त्रज्ञांची रिक्त पदे विनाविलंब भरण्याबाबत तसेच जिल्हयात कृषी महाविद्यालय उभारण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१५-०९-२०२१) :** (१) सद्य:स्थितीत राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प ,पालघर (टप्पा-१) या योजनेमधील शास्रज्ञ (पशुशास्र) ,सहाय्यक पैदासकार तृणविद्यावेत्ता (चारा पैदास )ही पदे रिक्त आहेत. संशोधन केंद्रामार्फत सुरू असलेल्या भातावरील संशोधन कार्यावर परिणाम होणार नाही याची खबरदारी डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठामार्फत घेण्यात येते .

(२) हे खरे आहे.

(३) विद्यापीठामार्फत चांगल्या प्रतीचे बियाणे प्रतिवर्षी शेतक-यांना उपलब्ध करून देण्यात येते सन २०१९-२०२० मध्ये देखील ग्रामबिजोत्पादन योजनेअंतर्गत १७१.३०क्विंटल भात बियाणे शेतक-यांना पुरविण्यात आले.

विद्यापीठातील शास्रज्ञांमार्फत शेतक-यांकरीता प्रशिक्षणाचे कार्यक्रम घेण्यात आले आहेत.

पालघर जिल्ह्यातील आठ तालुक्यातील शेतक-यांच्या तक्रार निवारणाकरिता संबंधित तालुका कृषि अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तक्रार निवारण समितीचे गठण केले जाते. कृषि संशोधन केंद्र, पालघर येथील शास्रज्ञ सदर समितीचे सदस्य असून कृषि विद्यापीठातील शास्रज्ञांनी शेतक-यांच्या शेतावर प्रत्यक्ष जाऊन त्यांच्या तक्रारीचे निराकरण केलेले आहे.

(४) सद्यस्थितीत राज्यात पदभरती करण्याबाबत निर्बंध आहेत. सदर निर्बंध उठवल्यानंतर रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही करणे शक्य होईल.

पालघर येथे कृषि महाविद्यालय स्थापन करण्याच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या पाचव्या अधिष्ठाता समितीच्या निकषानुसार सुधारीत प्रस्ताव विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेच्या मान्यतेने कृषि परिषदेच्या बैठकीसाठी सादर करण्याबाबत महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेने डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठास कळविले आहे. त्याअनुषंगाने सदरचा प्रस्ताव विद्यापीठाकडून अद्याप अप्राप्त आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाकडी (ता.राहाता, जि.अहमदनगर) पाणीपुरवठा योजनेसाठी शेती महामंडळाची जमीन मिळण्याबाबत**

**(१६) २७१५५ (२४-०३-२०२१). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाकडी (ता.राहाता,जि.अहमदनगर) गावातील नागरिकांना पाणीपुरवठा करणाऱ्या साठवण तलावात पाणीसाठा लोकसंख्येच्या प्रमाणात कमी साठविला जात असल्याने पाणी टंचाई निर्माण झाली आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास,नवीन साठवण तलावासाठी शेती महामंडळाची ४ हेक्टर ८८ आर जमीन वाकडी ग्रामपंचायतीला विनामुल्य मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१२-०८-२०२१) :** (१) हे खरे नाही

(२) व (३) वाकडी गावची पाणी पुरवठा योजना जुनी झाली असल्याने जल जीवन मिशन कार्यक्रमामध्ये योजनेचा समावेश करण्यात आला आहे. योजनेसाठी ग्रामपंचायतीने जागा उपलब्ध् करुन द्यावयाची आहे. यानुसार योजनेच्या साठवण तलावासाठी ग्रामपंचायतीकडून शेती महामंडळाकडे मोफत जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आली आहे.

---

## पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गावरील खेड-शिवापूर (पुणे) टोल नाक्यावर बनावट टोल पावत्या देऊन वाहन चालकांची फसवणुक होत असल्याबाबत

**(१७) २७१६३ (२२-०३-२०२१). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गावरील खेड-शिवापूर (पुणे) टोल नाक्यावर बनावट टोल पावत्या देऊन वाहन चालकांची फसवणूक सुरु असल्याचा गैरप्रकार दिनांक २५ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक गुन्हे शाखेला प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या स्टिंग ऑपरेशनमध्ये बनावट टोल पावतीचा गैरप्रकार निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गुन्हे शाखा पोलीस आणि राजगड पोलिसांच्या मदतीने या टोल नाक्यावरील कर्मचाऱ्यांची झडती घेतली असता त्यांच्या खिशामध्ये बनावट पावत्या आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खेड-शिवापूर टोलनाका येथे गैरप्रकाराच्या घटना वाढल्या असून टोल नका सुरु केल्यापासून अद्यापपर्यंत किती गैरप्रकारांच्या घटना या टोलनाक्यावर घडल्याची शासनाकडे नोंद आहे व त्या कोणत्या,

(५) असल्यास, या टोल नाक्यावर सर्व सामान्य नागरिकांची व शासनाची फसवणुक सुरु असल्याने शासनाने याची सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०७-२०२१) :** (१) पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गावरील खेड-शिवापूर टोल नाका केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारित आहे. त्यानुसार संबंधित प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी हे खरे नाही, असे कळविले असून याबाबत पुढीलप्रमाणे माहिती सादर केली आहे :-

सदर टोलनाक्यावर वाहन चालकांची फसवणूक होत नसून टोल संकलन एजन्सीच्या कर्मचा-यांनी बनावट टोल पावत्यांद्वारे केलेल्या टोल वसुलीची रक्कम कंत्राटदाराकडे जमा न केल्याने कंत्राटदाराची फसवणूक झाली असल्याबाबत कंत्राटदाराकडून कळविण्यात आले आहे.

(२) व (३) पुणे ग्रामीण पोलीस, भोर यांनी २४ आणि २५ फेब्रुवारी २०२१ रोजी शोध घेतला असता, खेडशिवापूर व आणेवाडी येथे असलेल्या टोल प्लाझावर काही जण डुप्लिकेट पावत्या देत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्याने पोलिसांनी एफआयआर नोंदविला असून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे ,असे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी कळविले आहे.

(४) यापूर्वी अश्या गैरप्रकारांच्या घटना घडल्याची नोंद त्यांचे कार्यालयात नसल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(५) दि.१५ फेब्रुवारी २०२१ पासून इलेक्ट्रॉनिक टोल संकलन पध्दत (FASTag) अनिवार्य केली असून त्याद्वारे सुमारे ९०% महसूल जमा होत असून उर्वरित रक्कम रोखीच्या स्वरुपात जमा होत आहे.

तथापी बनावट टोल पावत्या प्रकरणाचा पुणे ग्रामीण पोलीस, भोर विभाग, सासवड, पुणे यांचेकडून तपास करण्यात येत असून पोलिसांनी एफआयआर नोंदविला आहे व या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. तसेच सदर प्रकरणी कंत्राटदाराने देखिल पुणे ग्रामीण पोलीस, भोर विभाग, सासवड पुणे येथे तक्रार दाखल केली आहे.

सदर अनियमिततेमुळे कंत्राटदाराची फसवणूक होत असल्याने कंत्राटदाराकडून नियुक्त टोल संकलन एजन्सीला प्रस्तुत प्रकरणी तात्काळ कारवाई करण्यासाठी कळविले आहे, असे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहरात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची अंमलबजावणी करणेबाबत**

**(१८) २७१६७ (२२-०३-२०२१). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात ४८६ झोपडपट्ट्या असून त्यामध्ये सुमारे १,६५,००० कुटुंबाचे वास्तव्य असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्याकडे जवळपास ७००० पेक्षा अधिक पुनर्वसन प्रकल्पाचे प्रस्ताव आले असतांना त्या घोषित/अघोषित करण्याची कार्यपद्धती संथ गतीने सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कोथरूड, पुणे येथील सर्व्हे नं.८७/७, अ" आझादनगर-सुतार चाळ या ठिकाणी एसआरए प्रकल्पासाठी नागरिकांचे फोटो पास सह इतर आवश्यक कागदोपत्रांची प्रक्रिया पूर्ण झाली असतांना विकासक आणि प्रशासनाच्या समन्वयाअभावी गत अनेक वर्षांपासून सदर प्रकल्प प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार आझादनगर-सुतार चाळ हा पुनर्वसन प्रकल्प व पुणे शहरात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची त्वरीत अंमलबजावणी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०६-०७-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

पुणे शहरात ४८६ झोपडपट्टया असून, त्यामध्ये सुमारे १,६५,००० कुटुंबाचे वास्तव्य आहे. त्यानुसार पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्रामध्ये एकूण २६२ प्रस्ताव दाखल झाले आहेत. सद्यस्थितीमध्ये कोरोनामुळे कामकाजाच्या गतीवर प्रत्येकवेळी परिणाम झाला आहे. असे असले तरी त्यापैकी २२० प्रस्तावावर विविध टप्प्यावर कामकाज सुरु असून, ४२ प्रस्ताव दफ्तरी दाखल झाले आहेत. सदरची योजना लवकरात लवकर मार्गी लावणेबाबतचे आदेश विकासकांना देण्यात आले आहेत.

(३) (४) व (५) होय, हे खरे आहे.

स. नं. ८७/७ अ, सि. स. नं. १२०४ (पैकी) कोथरुड, पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण योजनेचा प्रस्ताव विकसक मे. भेलके ॲण्ड सह्याद्री यांनी दाखल केला आहे.सदर योजनाक्षेत्रातील झोपडीधारकांची पात्रता यादी दि. ०९/१०/२००९ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून सदर योजनेत निवासी पात्र ४० व बिगरनिवासी ०२ असे एकूण ४२ झोपडीधारकांपैकी ४० झोपडीधारक पात्र झालेले आहेत.

सदरची जागा ही पुणे मनपाच्या मालकीची असून सदर जागेसाठी विकासक यांना दि.स.नं. २०१४च्या विशेष नियमावलीतील नियम क्र.१२(१) नुसार निमशासकीय जागांवरील क्षेत्राकरिता २५% अधिमुल्य रक्कम भरुन घेणेकरिता विकासकास कळविण्यात आले आहे. तथापि, विकासक यांनी अद्यापहि सदरची रक्कम भरणा केली नाही.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत सदोष व्हेंटिलेटरचा पुरवठा झाल्याबाबत**

**(१९) २७२०८ (१२-०६-२०२१). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रामधील पालिकेच्या संत सावळाराम म्हात्रे क्रीडा संकुल, आर्ट गॅलरी जिमखाना, पाटीदार भवन या रुग्णालयांना केंद्र शासनाच्या पी.एम. केअर केंद्रातून प्राप्त झालेल्या व्हेंटिलेटरपैकी ८० व्हेंटीलेटर पुरविण्यात आले होते व त्याद्वारे गेले वर्षभर कोविड रुग्णांवर उपचार करण्यात आले होते. मात्र माहे एप्रिल, २०२१ या महिन्यात यापैकी काही व्हेंटिलेटर बंद पडल्यानंतर दुरुस्तीसाठी तज्ज्ञ इंजिनीयरला बोलविण्यात आले असता, त्यांनी दिलेल्या अहवालात सदरहू व्हेंटिलेटरपैकी काही व्हेंटिलेटर सदोष असल्याबाबत महापालिकेला कळविले असून सदर व्हेंटिलेटर १००% प्राणवायू दाखवत असताना, प्रत्यक्षात मात्र त्यामधून केवळ ५३ ते ५५ टक्के प्राणवायूचा पुरवठा होत असल्याचेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) व्हेंटिलेटरचा संबंध रुग्णाच्या थेट जीविताशी असल्याने महापालिका प्रशासनाकडून सदर व्हेंटिलेटर रुग्णालयात रुग्णासाठी लावण्यापूर्वी बायो इंजिनिअरमार्फत तपासून घेणे अत्यावश्यक असतानाही, कल्याण-डोंबिवली पालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून हलगर्जीपणा झाल्यामुळेच मागील काही दिवसांत या सदोष व्हेंटिलेटरमुळे अनेक रुग्णांचा नाहक बळी गेलेला आहे, हे ही खरे आहे काय?

(३) असल्यास, उपरोक्त परिस्थिती विचारात घेऊन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेसाठी पी.एम.केअर योजनेच्या फंडातून पुरविण्यात आलेल्या ८० सदोष व्हेंटिलेटर संदर्भात सखोल चौकशी करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल प्रधानमंत्री कार्यालयाला विनाविलंब पाठविण्यात यावा अशा आशयाचे मागणीचे एक निवेदन कल्याण ग्रामीण विधानसभा निर्वाचन क्षेत्राच्या लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य मंत्री व प्रधान सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडे दिनांक १० मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०७-२०२१) :** (१) केंद्र सरकारच्या पी.एम.केअर निधीतून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या रूग्णालयांना ८५ व्हेंटीलेटर पुरविण्यात आले होते. एप्रिल २०२१ मध्ये यापैकी काही व्हेंटीलेटर बंद पडल्यानंतर दुरूस्तीसाठी तज्ञ इंजिनिअरला बोलविले असता, ८५ व्हेंटीलेटरपैकी ०६ व्हेंटीलेटर सदोष असल्याचे महानगरपालिकेस सादर केलेल्या अहवालात नमूद केले आहे.

• तथापि सदर व्हेंटीलेटर १००% प्राणवायू दाखवत असताना प्रत्यक्षात मात्र त्यामधून केवळ ५३ ते ५५ टक्के प्राणवायूचा पुरवठा होत होता, अशी वस्तुस्थिती नाही.

(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या रूग्णालयांना पुरविण्यात आलेले सर्व ८५ व्हेंटीलेटर्स संबंधित कंपनीच्या इंजिनिअर्समार्फत तपासून व इन्स्टॉल करून घेतले आहे.

• सद्यस्थितीत ८५ व्हेंटीलेटरपैकी ७२ व्हेंटीलेटर कार्यरत असल्याचे, कल्याण-डोंबिवली महारनगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) अशा आशयाचे निवेदन सार्वजनिक आरोग्य विभागास प्राप्त झाले असून, सदर निवेदनावर सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत पुढील आवश्यक ती कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई (जि.पालघर) तालुक्यात ग्रामीण भागातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या योजना अयशस्वी झाल्याबाबत

**(२०) २७२११ (११-०६-२०२१). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई तालुक्यात (जि.पालघर) ग्रामीण भागातील ६९ गावांसाठी अंदाजित रुपये ८५ कोटी खर्चाच्या पाणीपुरवठा योजनेस राज्य शासनाने सन २००५ मध्ये मंजुरी देऊन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सन २००८ मध्ये सोपविण्यात आल्या आहेत तसेच जलसंपदा मंत्री यांच्या शुभहस्ते योजनेचे भूमिपूजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना अद्याप प्रलंबित असल्याने आता मूळ ८५ कोटी रुपये खर्चाच्या योजनेची किंमत रुपये १२७ कोटी इतकी झाली असून सन २००८ मध्ये या योजनेअंतर्गत टाकण्यात आलेल्या जलवाहिन्या गंजल्या असून उभारण्यात आलेले जलकुंभ निरुपयोगी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरण अखेर दिनांक १२ जून २०१३ रोजी मुंबई उच्च न्यायालयात गेले असता सदर काम सन २०१९ पर्यंत कार्यान्वित करण्यात येईल असे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले तसेच राज्य शासनाकडून या योजनेसाठी १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होऊनही सदर योजनेची किंमत ११२७ कोटी इतकी झाल्याने अद्याप सदर योजना प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ६९ गावातील वाढती लोकसंख्या व योजनेची वाढलेली किंमत पहाता शासनाने सदरहू योजनेचे काम विनाविलंब हाती घेऊन तातडीने कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने कोणतीही कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२०-०८-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे. योजनेतील वितरण व्यवस्था व मुख्य जलवाहिन्या जोडून ७ ते ८ वर्षाचा कालावधी झालेला आहे. या कालावधीत वसई-विरार महानगरपालिकेचे विविध कामामुळे पी.व्ही.सी प्रकारच्या पाईपच्या वितरण व्यवस्थेची व मुख्य जलवाहिन्यांची अनेक ठिकाणी तुट्फूट नासधूस झाली आहे. योजनेंतर्गत असणा-या डि. आय. जलवाहिन्या सुस्थितीत आहेत. जलकुंभाच्या जलदाब चाचण्या घेण्यात आल्या असून सदर जलकुंभ सुस्थितीत आहे. सदर योजनेतील ६९ गावांपैकी २८ गावांना पाणी पुरवठा सुरु केला असून महानगरपालिकेकडून उर्वरीत

गावांना पाणी उपलब्धतेनुसार उर्वरीत गुरुत्ववाहिनी कार्यान्वीत करुन पाणी पुरवठ्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही. मात्र सदर योजनेचे काम मार्च २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक ०७-०२-२०२० रोजी बैठक घेऊन जिल्हा परिषद, पालघर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व महानगर पालिका, वसई-विरार यांना विविध सुचना केल्या आहेत. त्यानुषंगाने ६९ गावातील जलकुंभापर्यंतच्या गुरुत्ववाहिनी कार्यान्वित करण्याचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सुरु केलेले आहे. आतापर्यंत ५१ गावांच्या जलकुंभाच्या जोडण्या पूर्ण झालेल्या आहेत. त्यापैकी २८ गावांना पाणी पुरवठा सुरु आहे. सदर योजनेंतर्गत उपांगा करिता जागा व रेल्वे क्रॉसीग ची परवानगी उशीराने प्राप्त होणे, एमएमआरडीए च्या रस्ता रुंदीकरणाच्या कामाच्या वेळेस जलवाहिन्यांचे झालेले नुकसान तसेच योजनेकरिता विविध उद्भवावर आधारित जलजोडण्या वसई-विरार महानगर पालिकेकडून उशीराने प्राप्त झाल्याने प्रकल्प कार्यान्वीत करण्यास उशीर झालेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मधील कोराना काळात केंद्राकडून देण्यात येणारी तुरडाळ वाटपाविना पडून असल्याबाबत**

**(२१) २७२२२ (११-०६-२०२१). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०२० च्या लॉकडाऊन काळात गोर-गरीब अन्नापासून वंचित राहू नये यासाठी केंद्र शासनाने पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत माहे एप्रिल ते नोव्हेंबर, २०२० या कालावधीत प्रति लाभार्थी ५ किलो गहू, तांदूळ व १ किलो डाळ देण्यात आली तसेच आत्मनिर्भर भारत योजनेअंतर्गत प्रवासी मजूर दुसऱ्या राज्यांमध्ये अडकले होते त्यांना प्रती व्यक्ती ५ किलो अन्न धान्य आणि १ किलो डाळ देण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील वर्षाच्या आत्मनिर्भर योजनेअंतर्गत १७६६ मॅट्रीक टन डाळ आणि गरीब योजनेमध्ये १,१३,०४१ मॅट्रीक टन डाळ शासनाला देण्यात आली होती मात्र शासनाच्या निष्काळजीमुळे ६,४४१ मॅट्रीक टन इतकी डाळ शिल्लक राहिली हि बाब राज्य शासनाने दिनांक ६ एप्रिल, २०२१ रोजी केंद्र शासनाला कळविली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र शासनाने दि. १५ एप्रिल,२०२१ रोजी शिल्लक डाळ त्वरीत लाभार्थ्यांना वितरीत करण्याचे आदेश राज्य शासनाला दिले असतानाही शासनाकडून हलगर्जीपणा झाल्याचे केंद्रीय अन्न व नागरीपुरवठा राज्य मंत्री यांनी दिनांक १ मे, २०२१ रोजी जाहिर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, केंद्र शासनाकडून लॉकडाऊन कालावधीमध्ये राज्यातील गरीबांना देण्यासाठी दिलेल्या धान्यांपैकी ६,४४१ मॅट्रीक टन डाळ तसेच मुंबईत १०० स्वस्त धान्य दुकानातील निम्याहून अधिक धान्याचे वाटप न केल्याने मुंबईत ५१५ टन सडलेली डाळ गोदामात पडून असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नागरीकांना धान्याचे वाटप करण्याबाबत हलगर्जीपणा करणाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन कोणती कारवाई केली तसेच वाटपाविना खराब झालेल्या डाळीबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२५-०८-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे. कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांसाठी माहे एप्रिल, २०२० ते जून, २०२० या कालावधीकरिता प्रतिमाह प्रति सदस्य ५ किलो तांदुळ व प्रतिमाह प्रति कुटुंब १ किलो डाळ तर, माहे जुलै, २०२० ते नोव्हेंबर, २०२० या कालावधीकरिता प्रतिमाह प्रति सदस्य ५ किलो अन्नधान्य (तांदुळ व गहू) व प्रतिमाह प्रति कुटुंब १ किलो डाळ मोफत उपलब्ध करुन दिली होती. तसेच, केंद्र शासनाच्या आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत राज्यातील विनाशिधापत्रिकाधारक, स्थलांतरित मजूर इत्यादीना माहे मे व जून, २०२० या कालावधीकरिता प्रतिमाह प्रतिव्यक्ती ५ किलो तांदुळ व प्रतिकुटुंब १ किलो अख्खा चणा मोफत वितरीत करण्यात आला आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे. केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत माहे एप्रिल, २०२० ते जून, २०२० या कालावधीकरिता ४६,०१९.०८ मे. टन डाळ व आत्मनिर्भर भारत योजनेअंतर्गत १,७६६.४५ मे. टन अख्खा चणा प्राप्त झाला होता. तसेच प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत माहे जुलै, २०२० ते नोव्हेंबर, २०२० या कालावधीकरिता ७६,६९८ मे. टन अख्खा चणा प्राप्त झाला होता. पात्र लाभार्थ्यांना वितरणानंतर शिल्लक राहिलेल्या ६,४४१ मे. टन डाळ/ अख्खा चण्याच्या वितरणाबाबत दि. ६.४.२०२१ च्या शासन पत्रान्वये केंद्र शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले होते. त्यानुषंगाने केंद्र शासनाच्या दि. १५.४.२०२१ च्या पत्रान्वये शिल्लक डाळ/अख्खा चणा राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना वितरीत करण्याचे निदेश दिले आहेत. केंद्र शासनाच्या सदर निदेशांनुसार दि. १६.४.२०२१ च्या शासन पत्रान्वये उपरोक्त शिल्लक डाळ/चणा वितरीत करण्याच्या सूचना सर्व संबंधितांना दिल्या आहेत.

(४) मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात १४८ मे. टन डाळ शिल्लक असून सदर डाळीचे वाटप करण्याबाबत त्यांना कळविण्यात आले आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पदोन्नतीची रिक्त पदे ही सेवा जेष्ठतेनुसार भरण्याच्या शासन आदेशा बाबत**

**(२२) २७३३६ (१२-०६-२०२१). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पदोन्नतीची १०० टक्के रिक्त पदे ही सेवा जेष्ठतेनुसार भरण्याचे आदेश शासनाने दिले असल्याची बाब माहे मे, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने २००४ मध्ये एक कायदा करून मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना पदोन्नतीत ३३ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता परंतु मा. उच्च न्यायालयाने पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरवले असून सदरचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, ३३ टक्के मागासवर्गीयांची पदोन्नतीची पदे राखीव ठेवून अन्य पदे सेवाजेष्ठतेनुसार भरण्याचे आदेश दिनांक २० एप्रिल, २०२१ रोजी शासनाने देऊनही पुन्हा माहे मे ,२०२१ मध्ये १०० टक्के पदोन्नतीची रिक्त पदे सेवा जेष्ठतेनुसार भरण्याचे आदेश देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, मा. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत मागासवर्गीय पदोन्नतीची पदे रिक्त ठेवण्याची आवश्यकता असतानाही आपलाच आदेश शासनाने बदलल्यामुळे मागासवर्गीय कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त आदेश रद्द करण्याची मागासवर्गीय अधिकारी कर्मचारी संघटना तसेच आंबेडकरवादी संघटना यांनी मागणी केल्यानंतर मा. उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली या विषयी झालेल्या बैठकीत मंत्रिमंडळातील मागासवर्गीय मंत्र्यानी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने उक्त आदेश रद्द करुन विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानंतर निर्णय घेण्याचा निर्णय झाला होता त्याअनुषंगाने राज्य शासनास विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त झाले आहेत काय,
(६) असल्यास, याआनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (३०-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे
(२) होय, हे खरे आहे
(३) व (४) पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करणाऱ्या मा.उच्च न्यायालय यांच्या दि.४.८.२०१७ च्या निर्णयास मा.सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीमध्ये आरक्षण देता येणार नाही तसेच पदोन्नतीच्या कोटयातील मागासवर्गीयांच्या राखीव जागा रिक्त ठेवता येणार नाहीत, असे कायदेशीर अभिप्राय शासनास प्राप्त झाल्यामुळे दि.७.५.२०२१ च्या शासन निर्णयान्वये पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त असलेली सर्व १०० टक्के पदे सेवा ज्येष्ठतेनुसार भरण्याचे आदेश दिले.
(५) व (६) दि.७.५.२०२१ च्या शासन निर्णयाविरुद्ध मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका दाखल झालेली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने सदर प्रकरणी सद्य:स्थितीत भाष्य करता येणार नाही, असे अभिप्राय विधि व न्याय विभागाने दिलेले आहेत. त्यामुळे शासनाने कोणती कार्यवाही केलेली नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या कर निर्धारण व संकलन विभागातील गैरव्यवहाराबाबत**

**(२३) २७४३५ (१३-०६-२०२१).श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे)** :सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या कर निर्धारण व संकलन विभागातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार सुरु असल्याची बाब माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरळी व परळ भागातील मिल मालकांकडून मालमत्ता करापोटी महापालिकेला कोट्यवधी रुपये येणे असताना, अधिकारी मात्र मालमत्ता कर आकारणी करताना व त्यांची देयके संबंधित जागा मालकांना पाठवताना त्यांच्या जागेचे आकारमान व त्यांचे मूल्य कमी दाखवत असून कोटी रुपयाऐवजी लाख रुपये आकारले जात असल्याचे निदर्शनास आले असल्याने, वरळी भागात मालमत्ता कर वसुलीत रुपये १०० कोटींचा तर संपूर्ण मुंबईत रुपये ७०० ते ८०० कोटी गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरळी येथील डॉ. आंबेडकर रोड, शिवसागर इस्टेट, सी आय रेसीडेन्सी येथील मालमत्तेचे क्षेत्रफळ १२,४२२.०२ चौ. मी. असून त्या मालमत्तेचे अंदाजे बाजारमूल्य रुपये २५० कोटी पेक्षा अधिक असताना सुद्धा पालिकेच्या कर निर्धारण व संकलन विभागातील अधिकाऱ्यांनी या मालमत्तेचे क्षेत्रफळ १,९१२.०८ चौ. मी. इतके दाखवून त्याचे अंदाजे मूल्य रुपये २३ कोटी ४८ लाख इतके दाखविले व त्यामुळे त्यांना फक्त १४,८८,७६४ इतकाच मालमत्ता कर आकारला असल्याची बाब माहे मार्च, २०२१ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रकरणी महापालिकेचा कोट्यवधींचा महसूल बुडविणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) वरळी व परळ भागातील मोकळ्या जागेवर विकसन होत असलेल्या मालमत्तांचे करनिर्धारण मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील प्रकरण ८ अन्वये व स्थायी समितीने मंजूर केलेल्या "भांडवली मूल्यधारित नियमावलीनुसार" व इमारत प्रस्ताव विभागाने मंजूर केलेल्या आराखड्यानुसार करण्यात येते.

तथापि बंद पडलेल्या मिलच्या जमिनी या मोठ्या क्षेत्रफळाच्या जमिनी असून, या जमिनीवर मोठे प्रकल्प विकसित होत असतात, त्यानुसार जसजसे आराखडे मंजूर होतात, तसतसे या भूखंडाचा बांधकाम परवाना (सीसी) मंजुरीच्या दिनांकापासून भांडवली मूल्यधारित नियमावलीनुसार प्रथमत: करनिर्धारण केले जाते. असे प्रकल्प मोठे असल्याने त्यामध्ये काही वेळा चटई क्षेत्र निर्देशांक, विविध वापरातील बदल, आरक्षण इत्यादींमध्ये बदल करण्यासाठी विकासकांकडून इमारत प्रस्ताव विभागाकडे मंजुरीसाठी प्रस्ताव सादर केले जातात. मालमत्तेत वेळोवेळी जसजसे बदल मंजूर करुन इमारत प्रस्ताव विभागाकडून आराखडे प्राप्त होतात तसतसे त्याअनुषंगाने करनिर्धारण आवश्यक ते बदल करुन सुधारीत देयके मालमत्ता धारकावर बजावून कर वसुलीची कार्यवाही केली जाते.

अशा प्रकल्पांतर्गत ज्या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त होते त्यावेळेस असणारा मंजूर आराखडा हा अंतिम समजला जातो. नवीन इमारतीचे करनिर्धारण करण्यापूर्वी सदर अंतिम मंजूर आराखड्याच्या अनुषंगाने जर करनिर्धारणात काही बदल आवश्यक असतील तर करनिर्धारणात तशी सुधारणा करुन त्यानुसार कर वसुली केली जाते. सदर कर वसुली झाल्यानंतरच भोगवटा प्रमाणपत्रासाठी "ना हरकत प्रमाणपत्र" दिले जाते. त्यानंतरच सदर भूखंडाचे करनिर्धारण बदलून नवीन इमारतीचे करनिर्धारण केले जाते. त्यामुळे महानगरपालिकेच्या महसुलाची पुरेपूर वसुली संबंधित विकासकाकडून केली जाते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी ५ इमारतींकरिता १२,४२२.०२ चौ.मी. क्षेत्रफळाचा एकत्रित लेआऊट दिनांक ०९.०५.१९६४ रोजी मंजूर झाला असून, सदर भूखंडावर इतर चार इमारती व १९१२.०८ चौ.मी. इतके बांधीव क्षेत्र असलेल्या "ई" प्लॉटवर शहा हाऊस ही बांधकामाखालील जमीन स्थित आहे.

त्यापैकी "ई" प्लॉटवरील शहा हाऊस इमारत जमीनदोस्त करुन सदर मोकळ्या भूखंडावर दिनांक ०१.०४.२००८ रोजीच्या प्रभाव्य दिनांकाने करनिर्धारण करण्यात आले आहे. तद्नंतर सन २०१८ साली मंजूर केलेल्या आराखड्यात मोकळ्या भूखंडाचे क्षेत्रफळ ३१२४.०९ चौ.मी. इतके होते. परंतु सदर भूखंडाचे करनिर्धारण करतांना प्रत्यक्ष मोजमाप केले असता तो १९१२.०८ चौ.मी. इतका आढळून आला व त्याअनुषंगाने रु. २०,८४,७२२ इतके करनिर्धारण करण्यात आले आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयातील आदिवासी भागातील पाणी पुरवठा योजना अयशस्वी होत असल्याबाबत**

**(२४) २७४४१ (११-०६-२०२१). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील प्रशासनाच्या दुर्लक्षतेमुळे वंगण विहिरीतील पाणी दुर्गंधी व शेवाळ युक्त झाले असून पिण्यास अयोग्य असल्याने ग्रामस्थांना भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर तालुक्यातील टाकीपठार येथील आपटे ग्रुप ग्रामपंचाईतीमधील २०० लोकवस्तीच्या वाडीतील ग्रामस्थांनी गावालगतच्या खोल दरीत दोन विहिरी बांधल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहापूर तालुक्यातील डोंगर पठार खोऱ्यात माहे एप्रिल व मे या दोन महिन्यात प्रत्येक वर्षी भीषण पाणी टंचाई निर्माण होत असल्याने शासनामार्फत अनेक योजना राबविण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रशासनाच्या दुर्लक्षतेमुळे वंगण विहिरीचे पाणी दुषित झाले असून दुषित पाण्यामुळे साथीचे आजार उद्भवण्याची भीती ग्रामस्थ व्यक्त करीत असून शहापूर तालुक्यातील डोंगर पठार खोऱ्यातील वास्तव्यास असणाऱ्या आदिवासींना माहे एप्रिल, मे मध्ये जाणवत असलेली भीषण पाणीटंचाई दूर करण्यासाठी शासनाने विविध योजना राबविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शहापूरमधील पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर होण्याच्यादृष्टीने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०२-०८-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे, सदरच्या दोन्ही विहिरी गावालगतच्या खोल दरीत असून शासनाच्या विविध योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या आहेत.

(३) हे खरे आहे, तथापि, तालुक्याचा काही भाग डोंगराळ, तीव्र चढ उतार आणि बेसॉल्ट खडकाचा असल्याने पाणी धारण क्षमता अत्यंत कमी आहे आणि पाणी पातळी स्थिरावत नाही. त्यामुळे योजना करुनही शेवटचे दोन महिने पाणी टंचाईला सामोरे जावे लागते.
(४) अशंत: खरे आहे. तथापि, वांगण विहिरीचे पाणी पिण्यासाठी वापरत नसून केंगाच्या विहिरीचे पाणी पिण्यासाठी वापरतात. आपटे आणि सर्व पाडयांकरिता स्वतंत्र विहिरी बांधण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर ठिकाणची कायमस्वरुपी पाणी टंचाई दूर करण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमा अंतर्गत (सध्याची जल जीवन मिशन अंतर्गत प्रगतीत) नळ पाणी पुरवठा योजना मंजूर असून प्रगतीत आहे
(५) जल जीवन मिशन अंतर्गत सदर वाडीसाठी नळ पाणी पुरवठा योजना प्रस्तावित केलेली आहे. तसेच उर्वरित पाणी टंचाई भासणा-या गाव /पाडयांकरिता ग्रीड योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील पाणी टंचाई दुर करण्याबाबत**

**(२५) २७४८४ (११-०६-२०२१). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयात तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली असून ३३ गावांतील ५१ वाडयांमध्ये ११ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, रत्नागिरी, खेड,लांजा,चिपळूण, मंडणगड, संगमेश्वर, राजापूर आदि तालुक्यांमध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मंडणगड, दापोली व खेड ( जि.रत्नागिरी ) शहरातील नळ पाणी पुरवठा योजनांचे प्रस्ताव शासनाकडे मंजूरी अभावी प्रलंबित असल्याचे माहे मे,२०२१ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्हयात पाणी टंचाई भासू नये म्हणून शासनाने टंचाई आराखडा तयार केला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे तसेच पाणी पुरवठा योजनांना तात्काळ मंजूरी देण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२०-०७-२०२१) :** (१) होय, सदरची स्थिती दिनांक ०२.०५.२०२१ पर्यंत होती.
(२) होय,
(३) जिल्हयामधील काही गावे/वाडयामध्ये पाणी टंचाई निर्माण झाली होती.
दिनांक १३.०६.२०२१ अखेरपर्यंत ६७ गावातील ११३ वाडयांना ४ शासकीय व ११ खाजगी टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला. मात्र सद्यस्थितीत पावसाळा सुरु झाल्याने टँकरने पाणी पुरवठा बंद करण्यात आला आहे.

(४) होय, जिल्हयात पाणी टंचाई भासू नये म्हणून ४६५ गावांतील ७४७ वाडयांसाठी टंचाई आराखडा तयार करण्यात आलेला आहे. त्यापैकी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली काही कामे पूर्ण झालेली आहे. उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात पोलिसांवर होत असलेले हल्ले

**(२६) २७६९५ (०९-०६-२०२१). श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अनिल पाटील (अमळनेर), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर राज्यात कोणतेही धार्मिक सण, सांस्कृतिक कार्यक्रम व अन्य जाहीर कार्यक्रमांवर यावर्षी शासनाने बंदी घातली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, असे असतांना नांदेड येथे गुरुद्वारा बोर्डाच्यावतीने होळी व मोहल्ला हल्ला निमित्त मिरवणूक काढण्यात येवून त्यास पोलिसांनी परवानगी नाकारल्याच्या रागातून बॅरिकेड्स तोडून बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांवरच तलवारीने व तुफान दगडफेक करुन हल्ला केल्याचे तसेच पोलीस वाहने जाळण्यात आल्याचे दिनांक २९ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असुन या हल्ल्यात पोलीस अधिक्षकांसह अन्य १० पोलीस अधिकारी गंभीररित्या जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच नेरुळ (नवी मुंबई) सेक्टर २० येथे गस्त घालत असलेल्या पोलीस शिपाई राठोड यांच्यावर दिनांक ३१ जानेवारी २०२१ रोजी वा त्यासुमारास हल्ला झाला, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या दोन्ही घटनांसंदर्भात करण्यात आलेल्या पोलीस कारवाईत किती जणांवर गुन्हा नोंदविण्यात आला आतापर्यंत किती जणांना अटक करण्यात आली आहे, तसेच याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२९-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय. तथापि, सदर हल्ल्यामध्ये दोन पोलीस अधिकारी व दहा पोलीस अंमलदार जखमी झाले आहेत त्यातील दोन पोलीस अंमलदारांवर तलवारीने हल्ला केल्यामुळे ते गंभीर जखमी झाले आहेत. या हल्ल्यात पोलीस वाहनांच्या काचा फोडणे व वाहनांवर दगडफेक केल्याची घटना घडली आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) श्री.हुजूर सचखंड गुरुद्वारा, नांदेड व देना बँक चौक, (गुरुद्वारा चौक), नांदेड येथे घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन वजिराबाद नांदेड गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यामध्ये ८४ आरोपींपैकी २७ आरोपींना अटक केली असून त्यामध्ये ३ विधी संघर्षित बालक यांचा समावेश आहे. उर्वरित आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास सुरु आहे.

देना बँक चौक, (गुरुद्वारा चौक), नादेड येथे घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यामध्ये १ विधी संघर्षित बालक यांचा समावेश असून ७० ते ८० फरार आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास सुरु आहे.

दिनांक ३१.०१.२०२१ रोजी नेरुळ (नवी मुंबई) सेक्टर २० येथे गस्त घालत असलेल्या पोलीस शिपाई राठोड यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या अनुषंगाने गुन्हा नोंद करण्यात आलेला असून सदर गुन्ह्यात एकूण चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर आरोपी तळोजा कारागृहात बंदिस्त आहेत. पुढील तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासींची रिक्त पदे भरण्यासंदर्भात बिरसा क्रांतीदल संघटनेने केलेल्या मागणीबाबत**

**(२७) २७८०० (१२-०६-२०२१). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपिठ नागपूर यांनी दिलेल्या आदेशान्वये राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय निर्गमित करून बिगर आदिवासींनी आदिवासींच्या बळकावलेल्या राखीव जागा रिक्त करून आणि रिक्त होणाऱ्या अनुसूचित जमातीच्या प्रवर्गाची पदे, अनुसूचित जमातीच्या जात वैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारातून सेवाप्रवेश नियमानुसार विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून भरण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखून पदे भरण्याची कार्यवाही कारण्याचे राज्यातील प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांना आदेशीत केले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेष पदभरती कार्यक्रमाची मुदत संपुष्टात येऊनही अद्यापही १२,५०० रिक्त पदे भरलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यभरात बनावट जातप्रमाणपत्राच्या आधारे अनुसूचित जमातीची बिगर आदिवासींनी बळकावलेली १२,५०० पदे भरण्यासाठी विशेष भरतीमोहीम राबविण्याची मागणी बिरसा क्रांतीदल संघटनेने मा. मुख्यमंत्री, आदिवासी विकास मंत्री, यांचे मुख्य सचिव आदींकडे जव्हारचे तहसिलदार यांच्यामार्फत माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन देऊन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अनुसूचित जमातीच्या राखीव जागा तात्काळ भरण्यासाठी जी पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत येतात त्या पदांच्या जाहिराती काढून भराव्यात आणि जी पदे आयोगाच्या कक्षेबाहेर येतात ती रिक्त पदे सरळ सेवेने भरण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखून कार्यवाही सुरू करावी अशीही मागणी सदरहू निवेदनाद्वारे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ,

(६) नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (३०-०७-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासन सेवेत रुजू झालेल्या व सदर जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याबाबतचे तसेच सदर अनुसूचित जमातीची रिक्त झालेली पदे कालबद्ध कार्यक्रम राबवून दि.१.२.२०२० पर्यंत भरण्याचे आदेश दि.२१.१२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत.

तथापि, त्यानंतर कोविड-२०१९ या महामारीमुळे राज्यात लॉकडाऊन घोषित झाल्यामुळे सदर भरती प्रक्रिया पूर्ण क्षमतेने राबविणे शक्य झाले नाही.

(३) बिरसा क्रांती दल संघटनेचे जव्हार तहसिलदार कार्यालयामार्फत सादर केलेले निवेदन या विभागास प्राप्त झालेले नाही. तथापि, सदर संघटनेचे, तहसिलदार अंबरनाथ कार्यालयामार्फत मुख्यमंत्री कार्यालयास सादर केलेले दि.२.३.२०२१ चे पत्र, विभागास प्राप्त झालेले आहे.

(४) हे खरे आहे.

(५) विभागाच्या दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जमातीच्या जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग केल्यामुळे रिक्त झालेली पदे दि.३०.६.२०२१ पर्यंत भरण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना सर्व विभागांना दि.१५.४.२०२१ च्या अ.शा. पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आरे दूध केंद्र चालकांना मुबलक दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचा पुरवठा करण्याबाबत

**(२८) २७९०५ (०९-०६-२०२१). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये आरे दुधाचे अनियमित वितरण, वारवांर दूध नासणे, कृषकाळात दुधाचे वितरण कमी करणे, फुटलेल्या दुधाच्या पिशव्यांमुळे होणाऱ्या नुकसानाची दखल न घेणे, दैनंदिन दूध विक्री रक्कम भरण्याची किचकट पद्धत इत्यादी कारणांमुळे आरेचा ग्राहक दुरावला जात असल्यामुळे आरे दूध केंद्र चालकांना मुबलक दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचा पुरवठा करावा आदी मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र दूध वितरक सेनेने दिनांक १८ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत आयुक्त, दुग्धविकास विभाग यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १५ एप्रिल ते १५ मे, २०२१ या दरम्यानच्या टाळेबंदी काळात सकाळी ७ ते ११ या वेळेतच आरे स्टॉल सुरु ठेवण्यास परवानगी असल्यामुळे मोठ्या प्रमाणात विक्री अभावी शिल्लक राहिलेले दुध घेण्यास नकार दिल्याने स्टॉलधारकांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (२५-०६-२०२१) :** (१) असे निवेदन प्राप्त झाले आहे हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. कोविड काळात लागू असलेल्या टाळेबंदीच्या कालावधीत बृहन्मुंबई दूध योजनेअंतर्गत असलेल्या आरे, वरळी व कुर्ला दुग्धशाळेकडून केंद्र चालकांच्या मागणीनुसारच दूधाचे वितरण झाले आहे. त्यामुळे आरे स्टॉल धारकांचे नुकसान झाले आहे ही वस्तूस्थिती नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील श्री सोमनाथ मंदीर देवस्थान परिसर सौंदर्यीकर ण व विकासासाठी निधी उपलब्ध होण्याबाबत**

**(२९) २७९१९ (११-०६-२०२१). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मारोडा येथील श्री सोमनाथ मंदिर देवस्थान परिसर (ता. मुल, जि.चंद्रपूर) येथील सौदर्यीकरण व विकासासाठी निधी उपलब्ध होण्याबाबत विधानसभा सदस्य बल्लारपूर यांनी मा. पर्यटन मंत्री यांना १२ वेळा निवदने सादर केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार .२४.९९ लक्ष रुपयांचा प्रस्ताव पर्यटन संचालनालयाकडून दि.२ नोव्हेंबर, २०२० च्या पत्रान्वये प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावाची छाननी/ तपासणी केली असता आढळलेल्या त्रुटींची पुर्तता करुन फेर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्तावावर प्रादेशिक पर्यटन विकास योजनेच्या निकषांनुसार कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. आदित्य ठाकरे (२६-०८-२०२१) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) व (५) सदर प्रस्ताव राज्य पर्यटन विकास समितीच्या बैठकीमध्ये विचारार्थ ठेवण्यात येईल.

---

**श्री संत कौंडय्या महाराज संस्थान श्रीक्षेत्र धाबा (ता. गोंडपिपरी जि. चंद्रपूर) येथे सांस्कृतीक सभागृहाचे बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध होण्याबाबत**

**(३०) २७९२५ (११-०६-२०२१). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री संत कौंडय्या महाराज संस्थान श्रीक्षेत्र धाबा (ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर) येथे सांस्कृतिक सभागृहाच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध होण्याबाबत विधानसभा सदस्य बल्लारपूर, यांनी मा.पर्यटन मंत्री यांना दिनांक १० मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास १२ निवेदने सादर केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर सभागृहाच्या बांधकामास निधी उपलब्ध होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (३०-०७-२०२१) :** (१) हे खरे आहे
(२) पर्यटन विभागाचा शासन निर्णय क्र. टीडीसी २०१८/१०/ प्र. क्र. ९२७/पर्यटन, दि ३१/१०/२०१८ अन्वये श्री संत कौडय्या महाराज संस्थान श्रीक्षेत्र धाबा (ता. गोंडपिंपरी, जि. चंद्रपुर) येथे सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम करण्यासाठी रु. ९७.८३ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जगदंबा संस्था केळापूर (ता. पांढरकवडा, जि. यवतमाळ) च्या विकासकामांसाठी निधी उपलब्ध होण्याबाबत**

**(३१) २७९२८ (११-०६-२०२१). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जगदंबा संस्था केळापूर (ता. पांढरकवडा जि. यवतमाळ) येथे विकासकामांसाठी निधी उपलब्ध होण्याबाबत विधानसभा सदस्य बल्लारपूर यांनी मा.पर्यटन मंत्री यांना दिनांक १० मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास तब्बल १२ निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामासाठी निधी मागणीचा प्रस्ताव निधी वितरणाच्या अनुषंगाने आगामी राज्य पर्यटन विकास समितीच्या बैठकीमध्ये विचारार्थ ठेवण्याचे प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. आदित्य ठाकरे (२०-०८-२०२१) :** (१) होय.
(२) व (३) सदर कामासाठी निधी मागणीचा प्रस्ताव दि.१.३.२०२१ रोजीच्या राज्य पर्यटन विकास समितीच्या बैठकीमध्ये विचारार्थ ठेवण्यात आला होता. राज्य पर्यटन विकास समितीने दिलेल्या मान्यतेनुसार सदर कामासाठी शासन निर्णय, दि.२२.०३.२०२१ अन्वये रु. ५५.०० लक्ष निधी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### देवाडा खुर्द (ता. पोंभुर्णा, जि. चंद्रपूर) अंतर्गत देवाडा खुर्द व रामपूर दिक्षीत येथे पाणी पुरवठा योजना मंजूर करण्याबाबत

**(३२) २७९३० (११-०६-२०२१). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत देवाडा खुर्द (ता. पोंभुर्णा, जि. चंद्रपूर) अंतर्गत देवाडा खुर्द व रामपूर दिक्षीत येथे २ लक्ष क्षमतेची पाणी पुरवठा योजना मंजूर करण्याबाबत वि.स.स. बल्लारपूर यांनी पाणी पुरवठा मंत्री यांना दिनांक १० मे, २०२१ रोजी वा त्या सुमारास १२ निवेदन सादर केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव पाटील (१२-०७-२०२१) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) पोंभुर्णा व १५ गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेत समाविष्ट देवाडा खुर्द या गावाची सन २०११ ची लोकसंख्या २६८१ असून सन २०३७ची प्रकल्पीत लोकसंख्येनुसार ५५ लिटर प्रती माणसीप्रमाणे आवश्यक पाणी प्रती दिन २ लाख लिटर असल्याने १,०५,००० लिटर पाणी टाकी क्षमता उपलब्धतेप्रमाणे पाणी टाकी दिवसातून २ वेळा भरण्याचे प्रयोजन आहे. तसेच रामपूर दिक्षीत या गावाची प्रकल्पीत लोकसंख्येप्रमाणे ५५ लिटर प्रती माणसीप्रमाणे आवश्यक पाणी प्रती दिन ४०,००० लिटर असल्याने उपलब्ध टाकी दिवसातून २ वेळा भरण्याचे प्रयोजन आहे. त्यामुळे रामपूर दिक्षीत गावास ६०,००० लिटर प्रती दिन पाणी उपलब्ध होईल. पोंभुर्णा व १५ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना कामे प्रगतीपथावरून असून सप्टेंबर, २०२१ पर्यंत सर्व कामे पुर्ण करून योजना कार्यान्वीत करण्याचे नियोजन आहे.

(३) सदर प्रकरणी विलंब झालेला नाही.

---

### मौजे मजास (ता. अंधेरी, जि. मुंबई उपनगर) येथील उद्यानाकरिता आरक्षित भूखंडाचे हस्तांतरण करण्याबाबत

**(३३) २८०४७ (१३-०६-२०२१). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मजास (ता.अंधेरी, जि.मुंबई उपनगर) येथील न. भु. क्र. २२४ सर्व्हे क्रमांक ९ हिस्सा क्रमांक ५ (पेप्सी कंपाऊंड गोडाऊन जवळील) हा भूखंड मुंबई नियोजित विकास आराखड्यानुसार उद्यानाकरिता आरक्षित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू भूखंड शासनाने ताब्यात घेवून तो मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित करणे अपेक्षित असताना अद्याप त्यानुषंगाने कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू भूखंडावरील आरक्षणानुसार या ठिकाणी उद्यान उभारण्याबाबत व त्यानुषंगाने सदरहू जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पालकमंत्री, मुंबई उपनगर यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे माहे नोव्हेंबर, २०११ मध्ये तसेच सहाय्यक आयुक्त, के पूर्व यांचेकडे माहे जून व सप्टेंबर, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान संपन्न झालेल्या बैठकीदरम्यान केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू मागणीचे अनुषंगाने उक्त भूखंडाचे हस्तांतरणाबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली, तसेच वारंवार पाठपुरावा करूनही अद्यापपर्यंत सदरहू भूखंडाचे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व या प्रकरणी विलंबास जबाबदार असणारे संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली व करण्याचे प्रस्तावित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०९-२०२१) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन १९९१ च्या पुनर्रचित आराखड्यानुसार, के/पूर्व विभागातील न.भू.क्र.२२४, मौजे मजास हा मोठ्या आरक्षणाचा भूभाग उद्यान व तलाव या सार्वजनिक उद्दिष्टांकरिता आरक्षित असून सदर भूभाग निवासी पट्टयात वसलेला आहे.
(२) सदर भूभाग संपादित करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक ०५.०६.२०१५ रोजी ताब्यात घेण्यात आला आहे.
(३) अशा आशयाची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली हे खरे आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) व (५) सदर भूखंड भूबंदिस्त असल्याने तसेच, सदर भूखंडाकरिता पोहोच मार्ग नसल्याने, उद्यानाकरिता आरक्षित असलेल्या या भूखंडाचा विकास करता आला नाही.
तथापि, उद्यानातील पोहोच मार्गाकरिता पुढील प्रक्रिया सुरु असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**राज्यातील रेशनिंगचे काम अधिक पारदर्शक होणेकरिता लाभार्थ्यांकरिता एसएमएस सुविधा सुरु करण्याबाबत**

**(३४) २८०७१ (११-०६-२०२१). श्री.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात रेशनिंग बायोमेट्रीक पध्दतीने देण्यात येत असल्याने शासनाच्या हजारो कोटी रुपयांची बचत झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील काही रेशन धारकांकडून लाभार्थ्यांना युनिट प्रमाणे धान्य वाटप होत नसल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासाठी बायोमेट्रीक पध्दतीमध्ये अधिक पारदर्शकता आणण्याच्यादृष्टीने गोडावून मधून रेशन दुकानदारांना धान्याचा कोटा प्राप्त झाल्यावर व सदर धान्य लाभार्थ्याला दिल्यानंतर याबाबतची एसएमएस सेवा लाभार्थ्यांसाठी सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१८-०८-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे आहे, तथापि बायोमेट्रीक पध्दतीमध्ये अन्नधान्य वितरणामध्ये अधिक पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने रास्तभाव दुकानांमध्ये अन्नधान्य पोहचल्यावर गावांतील २५ लोकांना एसएमएस पाठविण्याची सुविधा उपलब्ध आहे. क्षेत्रीय कार्यालयांना त्यांच्या लॉग-ईनवर या

सुविधेकरिता एसएमएस उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात येते. सदर धान्य लाभार्थ्याला दिल्यानंतर लाभार्थ्यांना पावती देणे रास्तभाव दुकानदारांना बंधनकारक आहे. याबाबतची एसएमएस सेवा तुर्तास उपलब्ध नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर शहर महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत आशा कार्यकर्ती यांना थकित प्रोत्साहनपर भत्त्याची रक्कम अदा करण्याबाबत**

**(३५) २८०९४ (१२-०६-२०२१). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर शहर महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत आशा कार्यकर्ती यांना थकित प्रोत्साहनपर भत्त्याची रक्कम अदा करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर यांना दिनांक १५ एप्रिल, २०२१ रोजी वा त्या सुमारस लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०९-२०२१) :** (१) होय. चंद्रपूर महानगरपालिकेकडे असे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) व (३)
कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी चंद्रपूर शहर महानगरपालिका स्तरावर कार्यरत आशा स्वयंसेविका यांना किमान ०६ महिन्यासाठी मासिक रु.४०००/- प्रोत्साहन भत्ता मिळावा, यासाठी एकूण रु.२९,२८,०००/- इतके अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसह, तांत्रीक मान्यतेकरिता मा.जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचेकडे महानगरपालिकेकडून सादर करण्यात आलेला असून, त्यानुसार, मा.जिल्हाधिकारी यांचे स्तरावर पुढील प्रक्रिया सुरु आहे.

---

**मुंबईतील के.ई.एम. रुग्णालयातील डायमंड ज्युबिली सोसायटी ट्रस्टमध्ये पाच कोटी रुपयांचा झालेला गैरव्यवहार**

**(३६) २८३६४ (१२-०६-२०२१). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), अॅड.राहुल नार्वेकर (कुलाबा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील के.ई.एम. रुग्णालयातील डायमंड ज्युबिली सोसायटी ट्रस्टमध्ये सुमारे पाच कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गैरव्यवहार अनेक वर्षापासून अधिष्ठातांच्या बनावट स्वाक्षरीने होत असून, तत्संदर्भात केईएम रुग्णालयाचे विद्यमान अधिष्ठाता यांनी दिनांक २४ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास पोलीसात तक्रार केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी ट्रस्टचे लेखापाल व सहाय्यक लेखापाल यांच्यावर गैरव्यवहार केल्याचा आरोप झाला असून, या स्वायत्त संस्थेच्या निधीमध्ये संस्थेच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कायदेशीर गुन्हे दाखल करुन गैरव्यवहाराची रक्कम वसुल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०८-२०२१) :** (१) के.ई.एम. रुग्णालयातील डायमंड ज्युबिली सोसायटी ट्रस्ट या स्वायत्त संस्थेमध्ये रु. ५.२४ कोटी इतक्या रकमेचा गैरव्यवहार झाला असल्याचे आढळून आले आहे हे खरे आहे.
(२) व (३) सदर गैरव्यवहार अनेक वर्षांपासून होत असल्याचे निदर्शनास आले असून, सदर स्वायत्त संस्थेच्या निधीमध्ये संस्थेच्या कंत्राटी लेखापाल व कंत्राटी सहाय्यक लेखापाल यांच्यावर गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे.

त्याअनुषंगाने फोरोन्सिक ऑडिट केल्यानंतर कंत्राटी लेखापाल व कंत्राटी सहाय्यक लेखापाल यांनी गैरव्यवहार केल्याचे आढळून आले असून, सदर प्रकरणी के.ई.एम. रुग्णालयाचे विद्यमान अधिष्ठाता यांनी दिनांक २३ एप्रिल, २०२१ रोजी भोईवाडा पोलीस ठाणे, मुंबई येथे तक्रार केली आहे.
(४) सदर प्रकरणी भोईवाडा पोलीस ठाणे येथे दिनांक २०.०५.२०२१ रोजी गु.र.क्र. २७१/२०२१ कलम ४०८, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७७(अ), ३४ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तसेच गैरव्यवहाराची रक्कम वसूल करण्यासाठी दिवाणी खटला दाखल करण्याची प्रक्रिया सुरु केली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### डोंबिवली (पूर्व) (जि.ठाणे) येथील के.धर्मा हाईट्स अनधिकृत बांधकामाबाबत

**(३७) २८७९५ (१३-०६-२०२१). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) के.धर्मा हाईट्स (सद्यस्थितीत साई समर्थ पॅराडाईज को.ऑ.हौ.सोसायटी TNC/DOM/HSB(TC)/३२०४६ सन २०१९) स्वामी समर्थ मठाजवळ डोंबिवली (पूर्व) (जि.ठाणे) येथील अनधिकृत बांधकामाप्रकरणी संबंधित विकासकाविरूध्द मानपाडा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीचे सुरू असलेले व काही अंशी पूर्ण झालेले बांधकाम त्वरीत निष्कासित करण्यात यावे अन्यथा सदर अनधिकृत बांधकाम महानगरपालिकेकडून निष्कासित करण्यात येवून निष्कासनासाठी येणारा खर्च सर्व संबंधितांकडून वसूल करण्यात येईल असे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास संबंधितांना नोटीसद्वारे जारी केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी नोटीस जारी करूनही सदरहू अनधिकृत बांधकाम निष्कासित न केल्याने लाईफ इन लाईट या सेवाभावी संस्थेने दिनांक ५ मार्च, २०२० रोजी वा त्या सुमारास आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांना सदर अनधिकृत बांधकाम तातडीने निष्कासित करण्याबाबतचे ३१३८१/२०१९ अन्वये मा.उच्च न्यायालयात लेखी निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी स्टॅम्प क्रमांक दाखल जनहित याचिकेवरील अंतिम निर्णयानुसार सदरहू अनधिकृत बांधकाम निष्कासित करून या प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार अनधिकृत बांधकाम निष्कासित करून संबंधित विकासक व तत्कालिन दोषी अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०७-२०२१) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) सदरच्या अनधिकृत बांधकामांवर दि.२०.०९.२०१६ रोजी निष्कासनाची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली आहे.

• तथापि तद्नंतरही पुन्हा बांधकाम सुरूच ठेवल्याने सदर इमारतीच्या बांधकामधारकांविरूध्द मानपाडा पोलीस स्टेशन, डोंबिवली येथे दि.१३.०७.२०१८ रोजी गु.र.क्र.६६/२०१८ दाखल करण्यात आलेला आहे.

• सदर प्रकरणी श्री. मनोज सुंदरलाल निरबान यांनी मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. ३१३८१/२०१९ दाखल केली असून सदर प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

• मा. उच्च न्यायालयाच्या निकालाअंती पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येणार असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाचे काम पुर्ण करण्याबाबत**

**(३८) २८९०९ (११-०६-२०२१). श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयासह मराठवाडयातील पाणी टंचाई दुर करण्याठी मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाच्या पहिल्या टप्यास शासनाने तत्वत: मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाच्या माध्यमातून लातूरला उजनी की जायकवाडीचे पाणी मिळणार याबाबत स्पष्टता करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम निश्चित करण्यात आला असून औरंगाबाद, जालना, बीड, लातूर व उस्मानाबाद जिल्हयासाठी तयार करण्यात आलेल्या प्राथमिक संकल्पन अहवालास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.मंत्रीमंडळाच्या दि.२३ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर, वैजापूर व पैठण तालुक्यांना जायकवाडी धरणातून ग्रीड प्रस्तावित करणे तसेच उस्मानाबाद जिल्ह्यासाठी उजनी/सिना कोळेगाव/निम्न तेरना धरणातून ग्रीड प्रस्तावित करणे यासाठी प्रथम, द्वितीय व तृतीय ग्रीडच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर ग्रीड प्रकल्पाबाबत मा.मुख्यमंत्री यांनी बैठक घेऊन मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली कमिटी तयार करण्यात आली असून पैठण, गंगापूर व वैजापूर येथील प्रकल्पाच्या निविदेची कार्यवाही देखील सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, मराठवाड्यातील पाणी टंचाई दूर होण्याच्यादृष्टीने अनेक वर्षापासून प्रलंबित मराठवाडा ग्रीड प्रकल्प कधीपर्यंत पुर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री. गुलाबराव पाटील (०३-०९-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) होय हे खरे आहे.
(४) होय हे अंशतः खरे आहे.

मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक २३/२/२०२० च्या निर्णयानुसार मराठवाडा वॉटर ग्रीड या प्रस्तावित प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात अधिक टंचाईग्रस्त उस्मानाबाद, लातूर, बीड व औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण, वैजापूर व गंगापूर तालुके यांच्यासाठी उजनी धरण व जायकवाडी धरण येथून प्रकल्प अंमलबजावणी करण्याबाबत तपासणी करुन तात्काळ कार्यवाही करावी असे निदेश देण्यात आले.

तद्नंतर दि.२३.०६.२०२१ च्या मा.मंत्रीमंडळ बैठकीत औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील ग्रीडच्या प्रस्तावास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला.

औरंगाबाद जिल्ह्यातील इतर भाग, बीड, उस्मानाबाद, लातुर आणि उर्वरित पुढील टप्याबाबत निधीच्या व पाण्याच्या उपलब्धतेनुसार पुन्हा प्रस्ताव मा.मंत्रिमंडळापुढे आणण्यास मान्यता देण्यात आली.

(५) नाही, हे खरे नाही.
(६) दि.२३/६/२०२१ च्या मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीत पैठण तालुक्यातील ग्रीडला मान्यता देण्यात आली आहे. तसेच उर्वरित पुढील टप्याबाबत निधीच्या व पाण्याच्या उपलब्धतेनुसार पुन्हा प्रस्ताव मा.मंत्रिमंडळापुढे आणण्यास मान्यता देण्यात आली.

---

**मानोरा (जिल्हा वाशीम) तालुक्यातील १५ गावांमध्ये पाणीटंचाई निर्माण झाल्याबाबत**

**(३९) २८९६१ (१८-०६-२०२१). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मानोरा (जिल्हा वाशिम) तालुक्यातील १५ गावांमध्ये पाणीटंचाई निर्माण झाली असल्यामुळे सर्व गावांमधील विहीर अधिग्रहणाच्या सादर केलेल्या प्रस्तावापैकी केवळ तीन प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावांमध्ये अदयाप पाणी पुरवठ्याची कोणतीही व्यवस्था न केल्याने नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत नागरिकांनी गट विकास अधिकारी पंचायत समिती व जिल्हा प्रशासनाकडे माहे मे, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास सदर मागणीनुसार जिल्हा प्रशासन व पंचायत समिती मार्फत पाणीटंचाई दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०४-०८-२०२१) :** (१) नाही,
(२) नाही,
(३) नाही,

तथापि ग्रामपंचायत यांचेकडून तीन विहीर/बोअर अधिग्रहण मंजुरीचे प्रस्ताव गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेकडे प्राप्त झाले होते.

(४) विहिर/बोअर संदर्भातील अचुक व परिपुर्ण १६ प्रस्ताव प्राप्त झाले त्याच दिवशी सदर प्रस्तावास मंजुरी देण्यात आली आहे. तसेच त्याशिवाय ७ नळ योजना दुरुस्ती करण्यात आली. व १ तात्पुरती पुरक नळ योजना घेऊन त्याद्वारे पाणी टंचाई दुर करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही

---

**अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) येथील झाडांचे संगोपन न करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत**

**(४०) २९०५१ (१२-०६-२०२१). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंजनगाव सुर्जी-दर्यापूर (जि.अमरावती) येथे रस्ता रुंदीकरणात दुतर्फा असलेली झाडे तोडण्यात आली असून तेथे नवीन झाडे लावण्याचे आश्वासन देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंत्राटदाराने निकृष्ट दर्जाची रोपे लावून त्याचे योग्य संगोपन न केल्यामुळे ही रोपे नष्ट झाली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानूसार काय कार्यवाही केली आहे तसेच उक्त ठिकाणी वृक्षारोपण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०९-२०२१) : (**१) होय, हे खरे आहे.
अंजनगाव दर्यापूर (रा.मा.-२८२) या रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम करताना रूंदीकरणामध्ये येत असलेली झाडे तोडणे आवश्यक असल्याने रीतसर परवानगी घेऊन ३७ झाडे तोडण्यात आली होती. तसेच करारनाम्याप्रमाणे तोडलेल्या झाडांच्या बदल्यात २०० नवीन झाडांची लागवड करण्यात आली.
(२) हे अंशत: खरे आहे.
कंत्राटदाराने करारनाम्याच्या अटीप्रमाणे २०० रोपांची लागवड केलेली होती. त्यापैकी एकूण ५७ रोपे जीवंत असून इतर रोपे संगोपन व्यवस्थीतरीत्या न झाल्याने नष्ट झाली.
(३) उक्त प्रकरणी कंत्राटदारास पुनश्च: वृक्षलागवड करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे व त्यानुसार कंत्राटदाराकडून या पावसाळ्यात नष्ट झालेल्या रोपांच्या जागेवरती नवीन रोपे लावण्यासाठी खड्डे खोदण्याचे काम प्रगतीत असून वृक्षांची लागवड करण्यात येत आहे.
कंत्राटदाराने २०० वृक्षाची लागवड करून दोषदायित्व कालावधीपर्यंत संगोपन केल्यावरच कंत्राटदाराची सुरक्षा ठेव रक्कम ही परत करण्यात येणार असल्याची बाब करारनाम्यामध्ये नमूद आहे व सदर करारनाम्याच्या अटी व शर्तीनुसार कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खेड (जि.पुणे) तालुक्यातील लॉकडाऊनच्या काळात स्वस्त धान्य दुकानांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(४१) २९१४८ (११-०६-२०२१). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील लॉक डाऊनच्या काळात कामगार व नागरिक उपाशी राहू नयेत म्हणून शासनाने माहे, मार्च २०२० मध्ये अन्नधान्य वितरणाच्या योजना राबविण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामध्ये खेड तालुक्यातील काही गावांमध्ये बोगस रेशनिंग कार्ड तयार करून दुकानदारांनी रेशन वाटप करुन तसेच काही गावांमध्ये प्रत्यक्ष रेशनचे वाटप न करता नोंद करण्यात येऊन जनतेच्या रेशनिंगचा काळाबाजार करून गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निदर्शनास आले व त्यानुषंगाने संबंधित दुकानदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ (१९-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) खेड तालुक्यात माहे मार्च, २०२० ते आजपर्यंत पॉस मशीनद्वारे धान्य वितरीत करण्यात येत आहे. त्यामुळे बोगस शिधापत्रिकाधारकांना धान्य वाटप करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. परंतु रास्तभाव दुकानदारांने कमी धान्य वाटप, धान्याची पावती न देणे अशा तक्रारी प्राप्त झाल्याने, या तक्रारींची तहसिलदार, खेडमार्फत तपासणी करण्यात आली आहे.

(३) तहसिलदार, खेड यांनी केलेल्या तपासाअंती वाटप धान्य व नोंद रजिस्टर यामध्ये फरक आढळल्याने ५ रास्तभाव दुकानांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत, १ रास्तभाव दुकानाचा परवाना रद्द करण्यात आला आहे आणि ३ रास्तभाव दुकानदारांना दंड आकारण्यात येऊन दोषांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून त्यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील विशेष शिक्षकांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत**

**(४२) २९१८३ (११-०६-२०२१). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या दिनांक ५ जानेवारी, २०१७ च्या सेवा पुन:स्थापना आदेशानुसार शाळास्तरावर कार्यरत असलेल्या विशेष शिक्षकांना केंद्र शासनाने राज्य शासनाला पाठवलेले वेतन १२ महिन्यांपासून दिले गेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेष शिक्षकांनी समायोजनाची मागणी करु नये, यासाठी सुमारे ७४५ विशेष शिक्षकांना केंद्र शासनाने पाठवलेले वेतन राज्याच्या तिजोरीत येऊनही शिक्षण परिषदेने जाणीपूर्वक विशेष शिक्षकांच्या खात्यांवर जमा केले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य: पुन:स्थापित व शाळास्तरावर कार्यरत ठिकाणी प्रत्यक्ष रुजू नसलेल्या काही शिक्षकांना नियम डावलून वेतनाचा निधी मानधन स्वरुपात वर्ग केला जात आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१२-०८-२०२१) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.
पात्र शिक्षकांचे एकत्रीत वेतन केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे अदा करण्यासाठी निधी संबंधित जिल्हयांना वितरीत केला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाड (जि.रायगड) येथील मुंबई -गोवा महामार्गाचे चौपदरीकरण करणा-या ठेकेदाराच्या बेजबाबदारपणाबाबत**

**(४३) २९२९१ (१२-०६-२०२१). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड (जि.रायगड) शहरानजिक असलेल्या मुंबई -गोवा महामार्गाचे चौपदरीकरण करणा-या ठेकेदार कंपनीने महामार्गाच्या दोन्ही बाजूला खणून ठेवलेल्या खड्यांमध्ये रात्रीच्या अंधारात पादचारी आणि वाहन चालक पडून गंभीर जखमी झाल्याच्या घटना माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू महामार्गावर काम करणा-या ठेकेदारांनी दोन्ही बाजूला खड्डे खणतांना कोणतीही खबरदारी घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व तद्नुसार उक्त महामार्गाचे बेजबाबदारपणे काम करणा-या दोषी कंपनीविरूध्द व ठेकेदारांविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०७-०७-२०२१) :**(१) राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ वर करंजखोल हद्दीत महामार्गाच्या बाजूला खणलेल्या खड्यामध्ये सायकलस्वार पडून जखमी झाल्याची तक्रार प्राप्त झाल्याबाबत सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, महाड, यांचेमार्फत दि.१५.०२.२०२१ कळविले आहे. तथापि पोलीस विभागामार्फत अशी कोणतीही तक्रार जानेवारी २०२१ मध्ये प्राप्त झालेली नाही.
(२) हे खरे नाही.
सदर चौपदरीकरणाच्या कामासाठी विविध ठिकाणी आवश्यकतेनुसार खोदकाम करण्यात येत असून सदर काम MoRTH व IRC SP ५५ च्या सुरक्षा नामांकनानुसार सुरक्षा उपाययोजना करून करण्यात येत आहे.

सदर चौपदरीकरणाचे कामावर देखरेखीसाठी केंद्र सरकार मार्फत नियुक्त करण्यात आलेल्या ॲथॉरीटी इंजीनीअरमार्फत सुरक्षा उपाय योजना तपासून काम करण्यात येत आहे.
(३) (४) व (५) अनु.क्र. १ व २ च्या उत्तरात नमूद केल्यानुसार प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाड (जि.रायगड) येथील तारिक गार्डन नावाची इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेबाबत**

**(४४) २९२९७ (१८-०६-२०२१). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड (जि. रायगड ) येथील तारिक गार्डन इमारत दिनांक २४ ऑगस्ट ,२०२० रोजी वा त्या सुमारास कोसळून झालेल्या दुर्घटनेच्या चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, तसेच सदर चौकशी अहवालाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(२) असल्यास, सदर इमारतीसाठी घेण्यात आलेल्या आवश्यक परवानग्या तसेच संबंधित लेखी आणि डिजिटल रेकॉर्ड (कागदपत्रे) नगरपरिषदेच्या कार्यालयातून गहाळ झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आह काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार इमारतीसाठी घेण्यात आलेल्या आवश्यक परवानग्या तसेच संबंधित लेखी आणि डिजिटल रेकॉर्ड (कागदपत्रे) नगरपरिषदेच्या कार्यालयातून गहाळ झाल्याप्रकरणी चौकशी अहवालाच्या अनुषंगाने दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत व सदर दुर्घटनेत मृत पावलेल्या १६ रहिवाशांच्या नातेवाईकांना व जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०९-२०२१) :** (१) महाड येथील तारिक गार्डन इमारत दुर्घटना प्रकरणी दाखल गुन्ह्याच्या तपासात ८ आरोपी निष्पन्न झाले असून यापैकी ४ आरोपींवर मा. न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे. इतर आरोपी यांच्यावर पुरावा उपलब्ध करुन दोषारोप पत्र दाखल करण्याबाबत मा. न्यायालयाची परवानगी मिळाली असून गन्ह्याचा तपास पुढे सुरु असल्याचे पोलीस महासंचालक कार्यालयाने कळविले आहे.
(२) व (३) सन २०१६ पासून नगरपरिषदेचे रेकॉर्ड स्कॅनिंग (डिजीटल रेकॉर्ड) पध्दतीने सुरक्षित ठेवण्यात येत आहे. त्यावेळी स्कॅनिंग झालेले रेकॉर्ड व पोलीस विभागाला सोपविण्यात आलेली मुळ संचिका यांच्यामधील कागदपत्रांमध्ये कोणतीही तफावत नसल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

- सदरहू दुर्घटनेतील १६ मयत यांच्या नातेवाईकांना प्रत्येकी रु. ४०,०००/- अशी एकूण ६४ लक्ष रुपये वाटप करण्यात आलेले आहेत. तसेच, मुख्यमंत्री सहायत निधीतून प्रत्येकी रु. १ लक्ष प्रमाणे १६ लक्ष वाटप करण्यात आलेले आहेत.
- सदर दुर्घटनेतील एकूण ९ जखमींना महसुल विभागाच्या शासन निर्णयानुसार विशेष दराने आर्थिक मदत देण्यात आली असल्याचे तहसिल कार्यालय, महाड यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर (ता.जि.पालघर) जिल्हा परिषदेच्या नळ पाणीपुरवठा योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(४५) २९८०४ (११-०६-२०२१). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर (ता.जि.पालघर) जिल्हा परिषदेच्या नळ पाणीपुरवठा योजनेत जव्हार व मोखाडा या आदिवासी भागात ई-निविदेत कामे घेणाऱ्या ठेकेदाराने अनुभावाचे बोगस दाखले देऊन करोडो रुपयांची कामे मिळवल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पालघर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची चौकशी सुरु असून इतर दोषींवर कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रश्न भाग १ व २ च्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव पाटील (०९-०८-२०२१) : (**१) अंशत: खरे आहे. सदर बाब ऑगस्ट, २०१९ मध्ये निदर्शनास आलेली आहे. पालघर जिल्हा परिषदेच्या नळ पाणी पुरवठा योजनेत जव्हार व मोखाडा या तालुक्यात ई- निविदेमध्ये कामे घेणा-या ठेकेदाराने अनुभवाचे खोटे दाखले देऊन कामे मिळवल्याची बाब ऑगस्ट-२०१९ च्या दरम्यान निदर्शनास आली आहे.

(२) व (३) शासनाच्या दिनांक ३१.१०.२०१९ रोजीच्या पत्रान्वये सदरच्या अनियमिततेबाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे कळविले होते. त्यानुषंगाने कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, पालघर यांनी चौकशी करुन दिनांक ३०.१२.२०१९ रोजी चौकशी अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांना सादर केलेला आहे.

सदर चौकशी अहवालामध्ये मे. मितेश पारेख यांनी निवीदा प्रक्रियेमध्ये सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये अनियमितता केल्याचे सिद्ध झाले आहे. याबाबत मे. मितेश पारेख यांचेकडून मागविण्यात आलेल्या खुलाश्यात निविदा प्रक्रियेत देण्यात आलेले दाखले खोटे असल्याची कबुली दिलेली आहे. त्यानुषंगाने दिनांक १९.०५.२०२० रोजीच्या पत्रान्वये मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, कोकण व बांधकाम विभाग, मुख्या. जव्हार, जिल्हा परिषद, पालघर यांना मे. मितेश पारेख यांचे नोंदणीपत्र रद्द करणेबाबत कळविले आहे. बांधकाम विभाग, मुख्या. जव्हार, जिल्हा परिषद, पालघर यांनी मे. मितेश पारेख यांना निर्गमित केलेले स्वतंत्र कंत्राटदाराचे प्रमाणपत्र रद्द केले आहे. सदर कंत्राटदारास देण्यात आलेली जव्हार तालुक्यातील ०१ व मोखाडा तालुक्यातील ०३ कामे काढून घेण्यात आलेली आहेत.

तसेच प्रश्न भाग २ बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांच्या दिनांक १२.०२.२०२० रोजीच्या पत्रान्वये अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, ठाणे यांना तत्कालीन कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, पालघर यांची सदर प्रकरणी विभागामार्फत चौकशी करुन कारवाई प्रस्तावित करावी असे कळविण्यात आले आहे. तसेच सदरील अनियमिततेबाबत चौकशी अंती श्री. अमोल तु. शिंदे, कनिष्ठ अभियंता (कं) यांनी खोटा दाखला दिल्याची कबुली लेखी स्वरुपात दिलेली असल्याने दिनांक १३.०७.२०२० रोजी पासून त्यांची सेवा समाप्त केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

___

**बोरिवली (मुंबई) येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पाड्यांमध्ये**
**पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याबाबत**

**(४६) २९९१३ (१२-०६-२०२१). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली (मुंबई) येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पाड्यांमध्ये राहणाऱ्या आदिवासी कुटुंबांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असून येथील आदीवासींना अनेक खड्डे खोदून पाण्याची व्यवस्था करावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खड्ड्यांतील दूषित पाण्यामुळे आदिवासीना अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पाड्यांमध्ये राहणाऱ्या आदिवासी नागरीकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (१४-०९-२०२१) :** (१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील भागात २० आदिवासी पाडे आहेत. त्यापैकी ११ आदिवासी पाड्यांमध्ये नळाद्वारे पाणी पुरवठा होतो. उर्वरित पाड्यांमधील आदिवासी कुटुंबांना बोअरवेल / कच्च्या बावडी मधून पाणी उपलब्ध होत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) रिट याचिका ३०५/९५ मधील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशांमुळे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाड्यांना नव्याने नागरी सुविधा पुरविता येत नाहीत. मात्र अस्तित्वात असलेल्या नागरी सुविधा कार्यान्वीत आहेत व आवश्यकतेनुसार त्यांच्या दुरुस्तीस परवानगी देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भुसावळ (जि. जळगाव) तालुक्यातील ३१ गांवे सामूहीक पाणी पुरवठा योजनेचे**
**काम संथ गतीने सुरु असल्याबाबत**

**(४७) ३०१८४ (१८-०६-२०२१). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि. जळगाव) तालूक्यातील ३१ गाव सामूहीक पाणी पुरवठा योजनेचे काम संथ गतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंडारी, साठेगांव येथील पाणी पुरवठा योजना मंजूरीसाठी प्रलंबीत आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, खडका येथील योजनेचे काम पुर्ण होऊनही पाणी पुरवठा सुरळीत झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, योजना पुर्ण न झाल्याने नागरीकांना पिण्याच्या पाण्यासाठी १० ते १२ दिवस प्रतिक्षा करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार प्रलंबीत पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्याच्याद्दष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव पाटील (०३-०९-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

रेल्वे विभागाने दि.३/६/२०२१ रोजी आचेगाव येथील रेल्वे क्रॉसींगला परवानगी दिल्याने उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

सदर योजनांचे प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) होय, हे अंशत: खरे आहे,

योजनेतील एकूण पाच भागापैकी चार भागात पाणी पुरवठा सुरु आहे. एका भागात (जुने खडके) नविन योजनेद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी समांतर पाईप लाईन टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) नाही, हे खरे नाही.

जुना खडका गावास अस्तित्वातील योजनेतून एक दिवसा आड ग्रामपंचायत मार्फत पाणी पुरवठा करण्यात येत आहे. इतर चार भागात नवीन योजनेतून दररोज पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(५) भुसावळ जि.जळगाव येथील ३१ गावे सामुहिक पाणी पुरवठा योजनेतील ८०% कामे पूर्ण करण्यात आलेली असून योजनेतील शुध्द पाणी गुरुत्व वाहीनीसाठी आचेगांव गावाजवळ रेल्वे क्रॉसिंगचे कामास दिनांक ३/६/२०२१ नुसार रेल्वे विभाग, भुसावळ यांनी परवानगी दिली. तथापि पावसाळ्यामुळे सदरील कामे रेल्वे खात्यामार्फत बंद केले आहे. सदरील रेल्वे क्रॉसिंगचे काम पावसाळा संपल्यावर ऑक्टोबर २०२१ व नोव्हेंबर २०२१ या दोन महिन्याच्या कालावधीत मक्तेदारामार्फत पूर्ण करुन घेण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेगाव ते पंढरपूर (ता.शेगाव, जि.बुलढाणा) या पालखी मार्गावरील रस्त्याच्या बांधकामाबाबत**

**(४८) ३०३५० (१८-०६-२०२१). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील शेगाव ते पंढरपूर या ६५ किमी पालखी मार्गावरील रस्त्याचे बांधकाम एच.ए.एम (हॅम) अंतर्गत करण्यात येत असून कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक ५ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्या सुमारास कंत्राटदारास देण्यात आला असून उक्त काम पूर्ण करण्याचा कालावधी दिनांक ४ फेब्रुवारी, २०२१ रोजीपर्यंत होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपुर्ण कामापैकी माहे ऑक्टोबर, २०२० अखेर पर्यंत केवळ सुमारे ३० टक्केच काम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याचे काम कंत्राटदाराकडून नियोजित वेळेत व गुणवत्तापूर्वक करून घेण्याकरीता करारनाम्यातील अटी-शर्ती नुसार अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला यांचेमार्फत कंत्राटदारावर प्रतिदिन दराप्रमाणे दंडात्मक नुकसान भरपाई किती रक्कम आकारण्यात आली आहे व त्यापैकी किती वसूल करण्यात आली आहे,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर काम कालमर्यादेत पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे व कामाची सद्य:स्थिती काय आहे तसेच काम केंव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे,

**श्री. अशोकराव चव्हाण (२९-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) करारनाम्यातील अट क्र. १२.३.१ नुसार Performance Security च्या ०.१% प्रतिदिनाप्रमाणे रु.१,८५,५००/- दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित आहे.

(४) सद्य:स्थितीत काम प्रगतीपथावर असून दि.३१/०३/२०२२ पर्यंत पुर्ण करण्यात नियोजन आहे.

---

**नगरपरिषद गंगाखेड (जि.परभणी) यांच्याकडून शहरातील नागरिकांना दुषित व अनियमित पाणीपुरवठा होत असल्याबाबत.**

**(४९) ३१०४२ (१८-०६-२०२१). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरपरिषद गंगाखेड (जि.परभणी) यांच्याकडून शहरातील नागरिकांना १५ दिवसाआड दुषित व अनियमित पाणीपुरवठा होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुबलक प्रमाणात पाणीसाठा असून देखील नगरपरिषद अनियमित पाणीपुरवठा करीत असल्याने नागरिकांनी वारंवार याबाबत तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गंगाखेड शहराला पाणीपुरवठा शुद्ध व सुरळीत होण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री यांना दिनांक ३१ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनान्वये मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त मागणीनुसार शुद्ध व सुरळीत पाणीपुरवठा करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) अंशतः खरे आहे.

शहराच्या वाढत्या लोकसंख्येमुळे बहुतांश भागात पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यकतेनुसार नवीन जलवाहिनी टाकण्यात आल्या असल्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी अहवाल सादर केला आहे.

(३) हे खरे आहे.

(४) शहरास शुद्ध व सुरळीत पाणीपुरवठा करण्यात येत असल्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी अहवाल सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धर्मदाय रुग्णालये गरीब रूग्णांना उपचार देत नसल्याबाबत**

**(५०) ३२२७३ (०१-०९-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्मदाय रुग्णालयामार्फत एकूण क्षमतेच्या १०% बेड्स मोफत व १०% बेड्स वा ५०% सवलतीमध्ये उपचार करणे (गोरगरीब जनतेला) आवश्यक असतांना, धर्मादाय रुग्णालये सर्रासपणे जनहिताच्या बाबींचे उल्लंघन करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोरगरीब रुग्णांना न्याय मिळण्यासाठी सर्व धर्मादाय रुग्णालयांतील रुग्ण सुविधेचे सेवापरिक्षण करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (०९-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही. राज्यातील धर्मादाय रुग्णालये महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ४१ कक अंतर्गत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी आदेशित केलेल्या योजनेचे अनुपालन सर्वसाधारणपणे करतात. तथापि, काही धर्मादाय रुग्णालयांकडून मा. उच्च न्यायालयीन योजनेचे पालन होत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास जिल्हास्तरीय कार्यालयाकडून व देखरेख समितीकडून आवश्यक चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करण्यात येते.

(२) नाही. यासंदर्भात नमूद करण्यात येते की, धर्मादाय रुग्णालयातील रुग्णसुविधेचे तपासणी करण्याकरीता शासनाच्या विविध विभागांकडून पुढिलप्रमाणे समित्या गठीत करण्यात आल्या आहेत.

१) धर्मादाय सह आयुक्त यांच्या अध्यक्षतेखलील तपासणी समिती, २) अपर मुख्य सचिव, आरोग्य विभाग यांच्या अध्यक्षतेखलील उच्चधिकार समिती, ३) जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखलील जिल्हास्तरीय समिती, ४) तज्ञ डॉक्टरांची समिती, ५) धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करण्याकरीता महाराष्ट्र विधानमंडळाची तदर्थ संयुक्त समिती.

सबब, वरील समित्यांनुसार धर्मादाय रुग्णालयातील रुग्णसुविधेंची वेळोवेळी तपासणी करुन आवश्यक कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.